# गजानन पाटील यांचे निधन

| अलिबाग प्रतिनिधी |

गजानन हिराजी पाटील यांचे रविवारी (दि.२८) निधन झाले. निधनासमयी ते ७८ वर्षाचे होते. शेकापचे निष्ठावंत कार्यकर्ते, ताडवागळे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच शैलेश पाटील यांचे ते काका होतं. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, सून, नात असा परिवार आहे.



गजानन पाटील अर्थात जी.एच. पाटील हे रायगड जिल्हा परिषदेमध्ये वेगवेगळ्या विभागात कार्यरत होते. त्यांनी अलिबाग पंचायत समितीसह कृषी विभागात तसेच जिल्हा परिषद अध्यक्षांचे स्विय सहाय्यक म्हणून सेवा केली. महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियन तसेच रायगड जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष म्हणून त्यांची जबाबदारी खंबीरपणे पार पडली. काही वर्षांपुर्वीच ते सेवानिवृत्त झाले होते. रविवारी त्यांचे हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. कोलघर येथील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी शेकाप तालुका सहचिटणीस नरेश म्हात्रे, कुर्डूस विभागीय चिटणीस विलास म्हात्रे, आरडीसीसी बँकेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी कमळाकर वाघमोडे तसेच जिल्हा परिषदेचे काही अधिकारी, कर्मचारी, कर्मचारी संघटनेचे पदाधिकारी, सदस्य व कार्यकर्ते यांनी उपस्थित राहून त्यांना श्रध्दांजली अर्पण केली. गजानन पाटील यांचा दशक्रीया विधी मंगळवारी (दि.६) हरिहरेश्वर येथे होणार असून उत्तरकार्य शुक्रवारी (दि.९) राहत्या घरी होणार असल्याची माहिती पाटील कुटूंबियांकडून देण्यात आली.

## खारघरमधील वाईन शॉपमध्ये राडा

**पनवेल :** खारघरमधील गोल्ड कॉईन वाईन मार्टमध्ये मद्यधुंद तरुणाने धिंगाणा घालत भीषण राडा केल्याची घटना घडली. दारूच्या नशेत असलेल्या तरुणाने रात्रीच्या सुमारास वाईनशॉपमध्ये घुसून लाकडी बांबूने नामफलक व इतर साहित्याची तोडफोड केली. अचानक झालेल्या या प्रकारामुळे परिसरात एकच गोंधळ उडाला. स्थानिक नागरिकांनी हस्तक्षेप करत संबंधित तरुणाला चोप देत ताब्यात घेतले. त्यानंतर खारघर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत मद्यधुंद तरुणाला ताब्यात घेतले.

## उलवेतील अनधिकृत होर्डिंग्ज पाडले

| पनवेल | प्रतिनिधी |

उलवेतील पुष्पक नगर परिसरात अटल सेतू लगत असलेल्या सिडको अधिसूचित व संपादित जागेवर अनधिकृतपणे उभारण्यात आलेले ६ अनधिकृत जाहिरात होर्डिंग पाडण्याची कारवाई सिडकोच्या अनधिकृत बांधकामे विभागाने केली आहे. या जाहिरात होर्डिंगने सिडकोचे अंदाजे ४६२ चौ. मीटर क्षेत्रफळ जागेवर अतिक्रमण केले होते. या जाहिरात होर्डिंग सिडकोच्या प्रचलित नियमावली व धोरणांचा भंग करुन तसेच सिडको महामंडळाची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आले होते. त्यामुळे सिडकोचे मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार तसेच मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (नवी मुंबई) यांच्या मार्गदर्शनाखाली ६ अनधिकृत जाहिरात होर्डिंगवर निष्कासन कारवाई करण्यात आली. सिडको अतिक्रमण विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली. अनधिकृत बांधकामे व जाहिरात फलकांमुळे शहराच्या नियोजनावर तसेच सुरक्षिततेवर विपरीत परिणाम होत असल्याने, अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सातत्याने सुरु राहणार असल्याचे सिडकोकडून स्पष्ट करण्यात आले आहे.


**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
(भारत सरकारचा उपक्रम)
सादर सेवा
**ई-निविदा आमंत्रण सूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेडचे मुख्य वाणिज्य व्यवस्थापक, आयआरईपीएस पोर्टल वर ई-टेंडरिंगद्वारे दोन-पॅकेट प्रणाली अंतर्गत सक्षम आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम पक्षांकडून "कोलाड आणि सुरतकल स्थानकांदरम्यान कोंकण रेल्वे वर रोल-ऑन-रोल-ऑफ (रोरो) सेवेचे मार्केटिंग आणि ऑपरेशन" साठी खुली निविदा मागवित आहेत, ज्याची मुदत एक वर्षाच्या कालावधीसाठी आहे, जी पुढील एका वर्षाकरिता वाढवता येईल. **निविदा सूचना क्रमांक: सीओ-16011-3-2023-सीओएमएम-2025, दिनांक 26.12.2025. ऑनलाइन ऑफर सादर करण्याची अंतिम तारीख/वेळ**: 27.01.2026 दुपारी 15:00 वाजेपर्यंत. हस्तलिखित निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. अधिक माहितीसाठी/सहभागी होण्यासाठी कृपया **www.ireps.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्या. शुद्धिपत्रके/परिशिष्टे, जर असतील तर, फक्त या संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्या जातील.



**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की, श्री. ऋतुराज शिरीष आमले व सौ. शलाका शिरीष आमले, रा. मुशेत, ता. अलिबाग, जि. रायगड यांनी त्यांचे खुद्द मालकीची व ताबेकब्जा वहिवाटीची, मौजे मुशेत, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. १९/१, एकूण क्षेत्र १.०२.२० हे.आर. (आकार रू.पै. १५.९८) पैकी क्षेत्र ०.१५.१० हे.आर ही मिळकत योग्य त्या खरेदीदारास विकण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या ७/१२ उतारी मालक कब्जेदार म्हणून श्री. ऋतुराज शिरीष आमले व सौ. शलाका शिरीष आमले यांची नावे दाखल आहेत. तरी सर्व लोकांस या नोटीसने असे कळविणेत येते की, वर नमूद केलेल्या मिळकतीत श्री ऋतुराज शिरीष आमले व सौ. शलाका शिरीष आमले यांचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, लिज, लिन, वहिवाट वगैरे कोणताही कसलाही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून २० (वीस) दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात आपल्या हरकती खाली सही करणार यांचेकडे आणून द्याव्यात. सदर विहीत मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे न आल्यास, सदर मिळकती या निर्वेध आहेत असे समजून सदर विद्यमान मालक योग्य त्या खरेदीदारासोबत विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व ती विद्यमान मालक व त्यांचे खरेदीदारावर बंधनकारक देखील असणार नाही, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

अलिबाग
तारीख : ३०/१२/२०२५

सही/-
**ॲड. विधान ए. पाटील**
रा. वत्सला टिळक रोड
एस.बी.आईच्या समोर अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबाईल : ९४२२३७५११५


## पान १ वरून

### रोजगार मंत्र्याचा ‘विकास’ अडचणीत

मानसिक आघात निर्माण झाला आहे. गोगावले यांच्याविरोधात चार गुन्हे दाखल आहेत. आगामी जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीत सार्वजनिक सुव्यवस्था बिघडविण्याची, मतदारांना धमकावण्याची आणि लोकशाही प्रक्रीया व सार्वजनिक सुरक्षेला हानी पोहचविण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे विकास गोगावले व त्यांच्या साथीदारांना निवडणूक प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत कार्यक्षेत्रातून हद्दपार करण्यात यावे, अशी मागणी महाडमधील काही नागरिकांनी केली आहे.

याबाबत सोमवारी (दि.२९) सुभाष निकम, चंद्रकांत जाधव, सोमनाथ ओझर्डे, दिलीप भागवत आदींनी गृहविभागाचे पोलीस उपअधीक्षक यांची भेट घेऊन त्यांना निवेदन देण्यात आले. त्यामुळे रोजगार मंत्री भरत गोगावले यांचा विकास अडचणीत सापडण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### पनवेलमध्ये शेकापचे जोरदार शक्तीप्रदर्शन

मध्ये केवळ १ च अर्ज दाखल करण्यात आला आहे. प्रभाग समिती ‘ब’ मध्ये मोडणाऱ्या प्रभाग क्रमांक ९ व १० मध्ये प्रत्येकी २ दोन अर्ज दाखल करण्यात आले आहेत. प्रभाग समिती ‘क’ अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्रमांक ११ मध्ये अर्ज दाखल करण्यासाठी सुरु असलेल्या प्रक्रियेदरम्यान २ उमेदवारांनी आपले अर्ज दाखल केले. तर, प्रभाग क्रमांक १२ व १३ मधून प्रत्येकी १ अर्ज दाखल करण्यात आलेला आहे. प्रभाग समिती ‘ड’ पनवेल एक मधील प्रभाग क्रमांक १५ मधून २, तर प्रभाग क्रमांक १६ मधून ५ अर्ज दाखल केले आहेत. तसेच, प्रभाग क्रमांक १९ मध्ये एका उमेदवाराने आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. अशा एकूण २९ उमेदवारांनी आपले नामनिर्देश पत्र दाखल केले आहेत.

दरम्यान, पालिका महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या शेकापकडून मोठे शक्तीप्रदर्शन करत माजी आमदार बाळाराम पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत उमेदवारांचे नामनिर्देश पत्र दाखल करण्यात आले. यावेळी महाविकास आघाडीकडून प्रभाग क्रमांक २ मधील सर्वच्या सर्व चार जागा शेतकरी कामगार पक्षाला सोडण्यात आल्या आहेत. त्यात अर्चना भोईर, योगिता फडके, अरविंद म्हात्रे आणि राम पाटील यांनी सोमवारी आपले नामनिर्देश पत्र दाखल केले आहेत. ऐन निवडणुकीत प्रभाग क्रमांक २ मधील भाजपाचे कार्यकर्ते असलेल्या राम पाटील यांनी शेकापमध्ये प्रवेश करून उमेदवारी मिळवली. त्यामुळे त्यांच्या प्रवेशाने प्रभाग क्रमांक २ मधील मविआची ताकत वाढली असल्याचा प्रत्यय कळंबोली-रोडपाली येथील पनवेल पालिकेच्या सुवर्ण दुर्ग या कार्यालयाबाहेर कार्यकर्त्यांनी केलेल्या गर्दीतून आला आहे. यावेळी, प्रभाग क्रमांक २ मधील आघाडीच्या चारही उमेदवारांचा विजय निश्चित असल्याचा आत्मविश्वास माजी नगरसेवक अरविंद म्हात्रे यांनी बोलून दाखवला आहे.

### पनवेल पालिका हद्दीत ११,४६० दुबार मतदार

दावा करण्यात आला होता. या हरकतीनंतर निवडणूक विभागाने सॉफ्टवेअर प्रणालीच्या मदतीने छायाचित्रांची तुलना, नावे, पालकांची माहिती आणि पत्ता यांची पडताळणी केली. ही प्रक्रिया १९ पर्यवेक्षकांच्या देखरेखीखाली राबविण्यात आली. तपासणीनंतर ११,४६० मतदार दुबार असल्याचे स्पष्ट झाले. या मतदारांना दोनपैकी कोणत्या एका मतदान केंद्रावर मतदान करायचे आहे, याबाबत विकल्प स्वरूपाचे हमीपत्र भरून घेतले जाणार आहे. जे मतदार त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर सापडणार नाहीत किंवा माहिती देणार नाहीत, त्यांच्याकडून मतदानाच्या दिवशीच मतदान केंद्रावर हमीपत्र घेतले जाईल. प्रभागनिहाय बीएलओ पथकांच्या माध्यमातून प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. हमीपत्र दिल्यानंतरही एखाद्या मतदाराने दोन ठिकाणी मतदान केल्याचे आढळल्यास त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल, असा इशारा निवडणूक विभागाचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी दिला आहे.

दरम्यान, दुबार व संशयास्पद मतदारांच्या मुद्द्यावर शिवसेना, शेकापसह विविध राजकीय पक्षांनी आक्षेप घेतला होता. काही प्रभागांत मोठ्या प्रमाणात हरकती नोंदविल्या गेल्याने हा विषय चर्चेत आला होता. दोषमुक्त अंतिम मतदार यादीच्या आधारेच निवडणूक कार्यक्रम राबवावा, अशी मागणी या राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींनी केली होती.

### थर्टी फर्स्टच्या पार्टीवर खाकीची नजर

सुद्धा होत असल्याने कळत-नकळत चरस, गांजा सेवन करणारे देखील मोठ्या प्रमाणात या विभागात येत असतात. त्यामुळे याकडे उत्पादन शुल्क विभागासह पोलिसांची बारीक नजर राहणार आहे. त्यासाठी पोलिसांनी विशेष दस्त तयार केला असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे जिल्हा पोलीस अलर्ट मोडवर असल्याने थर्टी फस्टच्या नावाने होत असणारा नंगा नाच थांबणार, असे बोलले जात आहे.

### रस्त्यांच्या कामांबाबत शेकाप आक्रमक

त्यामुळे हा रस्ता धुळीच्या साम्राज्यात अडकला आहे. या रस्त्यावरून दररोज शेकडो वाहने ये-जा करतात. या रस्त्यावरून धुळीचे लोट वाढल्याने श्वसनाचे आजार होण्याची भीती निर्माण झाली आहे. मानवी आरोग्यावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. त्याचा थेट परिणाम येणाऱ्या-जाणाऱ्या नागरिकांवर तसेच रस्त्यालगत राहणाऱ्या कुटुंबांवर होत आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, दमा व श्वसनाचे आजार असणाऱ्यांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अपूर्ण स्थितीत असलेल्या या रस्त्याच्या कामाबाबत शेकापचे तालुका चिटणीस सुरेश घरत यांनी संताप व्यक्त केला आहे. या अपूर्ण कामाबाबत विद्यमान आमदारांनी लक्ष देणे गरजेचे असताना त्यांनी याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याची प्रतिक्रिया उमटत आहे. ठेकेदाराच्या निष्काळजीपणामुळे या मार्गावरील प्रवाशांसह तेथील स्थानिकांना प्रचंड त्रास होत आहे. अधिकारीदेखील याबाबत काहीच बोलण्यास तयार नाही. या गंभीर समस्येबाबत आमदार, अधिकारी यांच्याकडून कोणतीही ठोस भूमिका घेतली जाताना दिसत नाही. नागरिकांनी वारंवार तोंडी तक्रारी करूनही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही. विकासाच्या नावाखाली नागरिकांना वेठीस धरणे योग्य नाही, अशी प्रतिक्रिया सुरेश घरत यांनी व्यक्त करीत तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशारा दिला आहे. जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली जाणार असल्याचे घरत यांनी सांगितले.

### पेण भाजपमध्ये उभी फूट

एकाकी पाडण्यात आल्याचे चित्र दिसून आले होते. त्यातच आता उपजिल्हा अध्यक्ष मिलिंद पाटील यांनी वरिष्ठ नेत्यांना डावलून बैठक घेतल्याने पक्षांतर्गत नाराजी अधिक वाढली आहे. या सर्व घडामोडींमुळे पेण भाजपमध्ये केवळ एक-दोन नव्हे तर, तब्बल तीन गट निर्माण झाल्याचे स्पष्ट झाले असून, याचा आगामी निवडणुकांवर काय परिणाम होतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### सायकलस्वाराचा मृत्यू

मुलास पाठीमागे बसवून अतिवेगाने दुचाकी चालवत होते. त्यावेळी त्यांचे दुचाकीवरील नियंत्रण सुटले आणि समोरून जात असलेल्या उमर राऊत यांच्या सायकलला पाठीमागून जोरदार ठोकर दिली. त्यात सायकलस्वार उमर राऊत यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली आणि ते जागीर ठार झाले. तसेच, आतिफ अब्दुल्ला खालिद (१७) देखील जखमी होऊन मोटार सायकलचे नुकसान झाले. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली असून मोटार सायकल चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या अपघाताच्या गुन्ह्याचा अधिक तपास पोलीस निरीक्षक निवृत्त बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार मंदार लहाने हे करीत आहेत.

### ३१ डिसेंबरला ‘नो डिलिव्हरी’

कामगार हे ऑनलाइन अर्थव्यवस्थेचा कणा असतात; मात्र, प्रत्यक्षात त्यांना दीर्घ कामाचे तास, अपुरा मोबदला आणि असुरक्षित कामाची परिस्थिती यांचा सामना करावा लागतो. अनेक वेळा डिलिव्हरी करताना सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होतो, अपघाताचा धोका वाढतो, तसेच काही ठिकाणी ग्राहकांकडूनही असंवेदनशील वागणूक मिळते, असा आरोप संघटनांनी केला आहे. या संपात देशभरातील मेट्रो शहरांसह प्रमुख शहरांमधील गिग वर्कर्स सहभागी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे ३१ डिसेंबरला ऑनलाइन फूड डिलिव्हरी व ई-कॉमर्स सेवा विस्कळित होण्याची किंवा काही प्रमाणात ठप्प होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नागरिकांनी वर्षाअखेरच्या नियोजनात याची दखल घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

### टाटानगर-एर्नाकुलम एक्सप्रेसला आग

मध्यरात्री दीडच्या सुमारास दुव्वाडा ओलांडल्यानंतर या एक्सप्रेसला आग लागली. ही रेल्वे अनकापल्ली जिल्ह्यातील यलमंचिली रेल्वे स्थानकाजवळ आल्यावर लोको पायलटला डब्यातून आगीच्या ज्वाळा निघताना दिसल्या. त्याने प्रसंगावधान राखत रेल्वे तत्काळ स्थानकावर थांबवली. पँट्री कारच्या शेजारी असलेल्या १ आणि २ या दोन एसी डब्यांमध्ये भीषण आग लागली होती. गाडी यलमंचिली रेल्वे स्थानकाजवळ पोहोचल्यापूर्वीच आगीने रौद्र रुप धारण केले होते, त्यामुळे दोन्ही डबे आणि डब्यांधील प्रवाशांचे सामान पूर्णपणे जळून खाक झाले. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या चार गाड्यांनी घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले. आग लागल्याची माहिती मिळताच प्रवाशांमध्येही घबराट पसरली आणि त्यांनी जीव वाचवण्यासाठी रेल्वेमधून बाहेर उडी घेतली. मात्र, विजयवाडा येथील चंद्रशेखर सुंदर (७०) हे १ डब्यात अडकल्याने त्यांना वेळीच बाहेर पडता आले नाही. त्यामुळे त्यांचा होरपळून दुदैवी मृत्यू झाला. दरम्यान, १ डब्याचे ब्रेक ओव्हरहीट झाल्यामुळे ठिणग्या उडून आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात आहे.


**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)
ई निविदा सूचना क्रमांक ६७/२०२५-२०२६ (मुंबई)
म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... मऔवि महामंडळाच्या जलवाहिनी सेवा रस्ता व पोहोच रस्त्यावरील स्थापित केलेल्या पथदिव्यांची वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹३६,३१,७८५.०० |
| २ | अलिबाग प्रादेशिक व नागोठणे औद्योगिक क्षेत्रासाठीच्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती....... विविध ठिकाणी स्थापित केलेल्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक फ्लो मीटरची दोन कॅलेंडर वर्षांच्या कालावधीसाठी वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे व सॉफ्टवेअर अपग्रेडेशनची तरतूद, स्थापना व चाचणी करणे. | ₹३९,८२,७००.०० |
| ३ | अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती..... नागोठणे व पोयनाड येथील अशुद्ध व शुद्ध जलशुद्धिकरण केंद्रातील ३३५ एचपी व २७० एचपी स्क्रिरल केज इंडक्शन मोटर्सची तातडीची दुरुस्ती करणे, | ₹१५,९६,१५५.०० |
| ४ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांची देखभाल व दुरूस्ती... पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील पथदिव्यांच्या ॲक्सेसरीजसह फिटिंगची श्रेणीवाढ करणे. | ₹३९,६५,५५८.०० |
| ५. | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्र... . इसाम्बे लेआउटचा विकास . इसाम्बे औद्योगिक क्षेत्रातील मेसर्स एक्सॉन मोबिलसाठी तात्पुरती पाणीपुरवठा व्यवस्था पुरविणे. | ₹३९,९३,६००.०० |
| ६ | रानसाई पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...... रानसाई पाणीपुरवठा केंद्रात विशेष उपचार करून पाण्यावरील रंग काढून टाकणे. | ₹४०,२७,५६०.०० |
| ७ | रानसाई पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... रानसाई वॉटर वर्क्स येथे ईएसई प्रकारच्या लाइटनिंग अरेस्टर व संबंधित कामांची दुरुस्ती व ओव्हरहोलिंग करणे. | ₹४०,०७,८८०.०० |
| ८ | पेण अलिबाग प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... पोयनाड येथील शुद्ध जलउदंचन केंद्राचे परिचालन करणे.. (दुसरी मागणी) | ₹२४,९६,९६५.०० |

उपरोक्त अ.क्र. १ ते ७ वरील कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक ३१/१२/२०२५ ते दिनांक १४/०१/२०२६ पर्यंत व अ.क्र. ८ वरील कामाबाबत निविदा प्रपत्र दिनांक ३१/१२/२०२५ ते दिनांक ०९/०१/२०२६ पर्यंत : https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी अ.क्र. १ ते ७ वरील कामांबाबत दिनांक ०५/०१/२०२६ पूर्वी व अ.क्र.८ वरील कामाबाबत दिनांक ०१/०१/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलासा अ.क्र. १ ते ७ वरील कामांबाबत दिनांक ०८/०१/२०२६ पासून व अ.क्र. ८ वरील कामाबाबत दिनांक ०२/०१/२०२६ वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.



**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
**अलिबाग सा.बां. विभाग, अलिबाग**
**पिन कोड -४०२ २०१**

ई-मेल पत्ता:-alibag.ee@mahapwd.com दुरध्वनी/फॅक्स क्रमांक :-(०२१४१) २२२०८४/२२५०९६

**ई-निविदा सूचना क्र.२३ सन २०२५-२०२६**

कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून नोंदणीकृत कंत्राटदारांकडून ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर : http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावी. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत रूपये |
|---|---|---|
| १. | फल्याण वावे जांभूळपाडा नवघर ठानाळे नाडसूर भार्जे भार्जेवाडी एरळ जामगांव रस्ता प्रजिमा-३८ लांबी ०/०० ते ३८/८०० मध्ये वृक्ष लागवड करणे ता. सुधागड जि. रायगड | ३६,७३,९४६/- |
| २. | उद्धर कुभांरघर महागांव चंदरगाव हातोंड गोंदाव रस्ता प्रजिमा-४० किमी ०/०० ते ३४/४०० मध्ये वृक्ष लागवड करणे ता. सुधागड जि. रायगड | २७,५५,४६०/- |
| ३. | पोयनाड उसर भदाणे रस्ता रा.मा. ९० की. मी. ०/०० ते २७/६०० मध्ये वृक्ष लागवड करणे ता.अलिबाग जि.रायगड | १८,३६,९७३/- |

ई-निविदा उपलब्ध कालावधी :- दिनांक ३०.१२.२०२५ (स.१०.००) ते दिनांक ०३.०१.२०२६ (सं.१८.००)

ई-निविदा उघडणे कालावधी :- दिनांक ०६.०१.२०२६ (दु. ३.०० वा.)
(कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग यांचे कार्यालयात)

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

1. http://mahapwd.com
2. http://mahatenders.gov.in

(सदर निविदेसूचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यात येईल.)

३. कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, अलिबाग कार्यालयातील सूचना फलक.

जा.क्र./सा.बां./अवि/निविदा/ ५७९३/२०२५
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां. विभाग, अलिबाग - ४०२ २०१
दिनांक :- २६/१२/२०२५

सही/-
**(एम.एम.धायतडक)**
**कार्यकारी अभियंता,**
**सा.बां. विभाग, अलिबाग,**
**जि. रायगड**

**विमाका/कोवि/२०२५-२०२६/२५९**



**रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग**
**केंद्र कार्यालय अलिबाग**
**निविदा सूचना**

बँकेची पनवेल शाखेकरीता मु.पो. पनवेल, मिडल क्लास हौसिंग सोसायटी, प्लॉट नं. १३५, ता. पनवेल येथे कार्यालयीन कामकाजाकरीता श्रीमती मंजुळा रमेश मंडलेशा (जैन) पनवेल यांच्या मालकीच्या जागेत भाड्याने घेण्याचे आलेल्या जागेमध्ये पहिल्या मजल्यावर कौन्टर फर्निचर व इतर अनुषंगिक कामे करून घेणेची आहेत.

१) सिव्हील वर्क
२) ॲल्युमिनिअम विंडो
३) फर्निचर
४) POP पेंटींग फॉल सिलिंग
५) इलेक्ट्रीकल वर्क
६) नेमबोर्ड
७) इलेक्ट्रीकल फिक्चर
८) प्लंबिंग वर्क
९) वॉटर प्रुफिंग, पेस्ट कंट्रोल
१०) पीव्हीसी फ्लोअरींग
११) कलर इनामिल
१२) वर नमूद केल्याप्रमाणे व त्या अनुषंगाने येणारी इतर कामे

त्याकरीता खाजगी कॉन्ट्रॅक्टर/सहकारी संस्था यांचेकडून निविदा मागविणेत येत आहेत.

इच्छुक निविदाधारकांनी आपल्या निविदा बँकेचे मुख्य कार्यालय अलिबाग येथे दिनांक ५.१.२०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत खाली सही करणारे स्वाक्षरीकार यांचे नावाने सादर कराव्यात. सहकारी संस्थांकडून आलेल्या निविदांना प्राधान्य देणेत येईल. याबाबत अधिक माहिती बँकेच्या केंद्र कार्यालयामध्ये मिळेल.

कोणतेही कारण न देता कमी अगर जास्त दराची कोणतीही अथवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय स्विकारणे अथवा नाकारणेचा हक्क बँकेने राखून ठेवला आहे. मुदतीनंतर आलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

सही/-
दिनांक : ३०.१२.२०२५ **उपमुख्य कार्यकारी अधिकारी**



**जाहीर हरकत नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर हरकत नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की, मौजे निकोप, ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे नं. २६ हिस्सा नं. २ क्षेत्र १.२८.०० हे. आर. चौ. मी. आकार १.३१ रु. पै. या मिळकतीची अद्यापी मोजणी व आकारफोड झाली नसल्याने सदर मिळकतीचे मालक व सहहिस्सेदार यांचेमध्ये प्रत्यक्ष जागेवर कोणाचे क्षेत्र किती व कुठे हे अद्यापी ठरलेले नसल्याने सदर मिळकतीचे आमच्या अशिलांचे सहहिस्सेदार सौ. भार्गवी भरत झांजे, सौ. शुभांगी शरद झांजे व श्री. रुपेश मुकुंद झांजे यांनी वा इतर कोणीही सदर मिळकतीच्या कोणत्याही क्षेत्राबाबत कोणासही हस्तांतरण करणेस सदर मिळकतीचे मालक व सहहिस्सेदार आमचे अशिल श्री. विश्वास सदाशिव झांजे, रा. निकोप, ता. कर्जत, जि. रायगड यांची सक्त हरकत आहे.

सदर मिळकतीच्या ७/१२ उताऱ्या सदरी आमच्या अशिलांसह त्यांचे सहहिस्सेदार सौ. भार्गवी भरत झांजे, सौ. शुभांगी शरद झांजे व श्री. रुपेश मुकुंद झांजे व इतर यांची नावे आहेत याचा गैरफायदा घेवून सदर सहहिस्सेदार सदर मिळकतीमधील पैकी क्षेत्र त्रयस्थ इसमांस विकणेच्या खटपटीत आहेत. तरी सदर मिळकतीबाबत सदर व्यक्तींशी कोणीही कोणतेही विक्री व्यवहार करु नयेत. अन्यथा सदर सहहिस्सेदार व भावी खरेदीदार तसेच सर्व संबंधितांविरुद्ध आमचे अशिलांस कायदेशीर कारवाई सुरु करणे नाईलाजाने भाग पडेल. तसेच सदर तथाकथित विक्री व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**ॲड. संदिप गोपाळ बागडे**
"श्री सदगुरू कृपा", १४४ अ,
मु. पो. शेलु, ता.कर्जत, जि.रायगड.
मोबा.नं. ९८६०६२६२४६.



**जाहिर नोटीस**

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. वावे तर्फे श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील गट क्र. व उपविभाग क्र. १६८, एकूण क्षेत्र ००-६९-०० पोटखराबा ०.१०.०० क्षेत्र आकारणी ०.२८, लागवड गवत पड पैकी रीनाराणी संदीप मोकल, श्री. संदीप कृष्णा मोकल रा. मु. वावे तर्फे श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड यांच्या मालकीचे एकूण क्षेत्र ००-२०-५०, आकार ०.०७ इतक्या क्षेत्राच्या मिळकतीचे विद्यमान मालक रीनाराणी संदीप मोकल, श्री. संदीप कृष्णा मोकल रा. मु. वावे तर्फे श्रीवर्धन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड यांच्याकडून जाण्या-येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह कायम विकत घेणेची ठरवली आहे. तशा आशयाची बोलणी आमच्या आशिलांनी संबंधीत जमिन मालकांन सोबत केलेली आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत असल्याबाबत मिळकत मालकांचे म्हणणे असून ती त्यांच्या आजपर्यंत ताबेकब्जात व वहिवाटीत आणि मालकी हक्कात असुन प्रत्यक्ष कसवणुकी खाली आहे. तसेच सदर मिळकतीबाबत कोणत्याही न्यायालयात दिवाणी अथवा फौजदारी स्वरूपाचा दावा दाखल नाही. वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ वहिवाट, ताबा बयाणा पावती, अखत्यारपत्र, साठेकरार, गहाण, बोजा, भाडेपट्टी, मृत्यूपत्रांकित दान, जप्ती, लीन, लीज, बक्षिसी, ट्रस्ट, पोटगी, वारसा किंवा कोणत्याही प्रकारच्या दस्ताने अथवा अन्य कोणत्याही प्रकारची कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच नमुद मिळकतीच्या हद्दी खुणांवरुन कोणाचीही हरकत असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसाचे आत संबंधीतांनी आपल्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासहीत (समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने) खाली सही करणार खरेदीदस्ताने वकील यांचेकडे पाठवावे व वकिलांची खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजून सदर मिळकतीवर आता कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत व असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत. असे गृहीत धरून आमचे अशिल संबंधीत मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर मागाहून उपस्थित करण्यात येणारी कोणाचीही हरकत आमचेवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

श्रीवर्धन
दिनांक : २९/१२/२०२५

सही/-
**ॲड. अतुल अरविंद चौगुले**
B.L.S. LL.B
खरेदीदाराचे वकील

## नि|व|ड|क



### श्रीवर्धन किनारी नियमांची पायमल्ली

**श्रीवर्धन** : नाताळच्या सुट्ट्या सुरु असल्यामुळे आणि ३१ डिसेंबरही तोंडावर आल्याने सर्वच पर्यटनस्थळांवर पर्यटकांची तुफान गर्दी आहे. श्रीवर्धन तालुकाही याला अपवाद नाही. दरम्यान, श्रीवर्धन समुद्रकिनारी पर्यटकांच्या वाढत्या गर्दीबरोबरच नियमभंगाचे प्रकारही समोर येत आहेत. समुद्र किनारी चारचाकी वाहने पाण्याच्या जवळील वाळूवर नेण्यास स्पष्ट मनाई असतानाही काही अति उत्साही पर्यटकांनी नियमांचे उल्लंघन करत आपली वाहने थेट वाळूवर नेल्याचे प्रकार निदर्शनास आले आहेत. यामुळे किनाऱ्याच्या सुरक्षिततेसह पर्यावरणालाही धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. याबाबत प्रशासनाने कठोर अंमलबजावणी करावी, अशी अपेक्षा सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.



### माझेरी रस्त्याची दुरवस्था

**कोर्लई** : मुरुड-एकदरा-डोंगरी मार्गावर खोकरी आगरदांडाकडे जाणाऱ्या माझेरी रस्त्याची कामे मे महिन्यात करुनही अवघ्या सहा महिन्यांत पुन्हा खाचखळगे व खड्डे पडून पार दुरवस्था झाली आहे. त्यामुळे वाहने चालवताना वाहनचालकांना अक्षरशः डोकेदुखी ठरत आहे. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वेळप्रसंगी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. कोट्यवधीचा निधी खर्चून मे २०२५ मध्ये या रस्त्याचे काम करण्यात आले, परंतु सहा महिन्यांत याठिकाणी डोंगरी ते माझेरी रस्त्याची परिस्थिती जैसे थे झाली. या रस्त्यावर उखडलेली खडी, पडलेले खाचखळगे व खड्ड्यांमुळे वाहनचालक व नागरिकांतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. तरी, संबंधित बांधकाम विभागाने रस्त्यावरील खाच खळगे व खड्डे बुजवावेत, अशी मागणी वाहनचालक व प्रवासीवर्गातून जोर धरीत आहे.



### करावी येथे मोतीबिंदू मोफत शस्त्रक्रिया

**पेण** : डॉ. सुहास हळदीपुरकर यांचे लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट पनवेल आणि ग्रामस्थ मंडळ करावी व नवतरुण मंडळ सामाजिक विकास मंडळ करावी यांच्या संयुक्त विद्यमाने करावी येथील केरेश्वर मंदिर येथे मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर पार पडले. हे शिबीर करावी येथे व्हावे म्हणून आरोग्यदूत तथा मा. जिल्हा परिषद सदस्य डी.बी. पाटील यांनी मोलाचे सहकार्य केले. करावी पंचक्रोशीतील ७६ नागरिकांनी या मोफत नेत्रचिकित्समध्ये सहभाग घेतला. यामध्ये मोतीबिंदू २३ रूग्ण सापडले. तर चष्माधारक १६, तर पुढील तपासासाठी १२ जणांना पाठवले आहेत. या शिबिरादरम्यान राष्ट्रीय खेळाडू तथा सहाय्यक पोलीस निरिक्षक संजय मोकल यांचेदेखील सत्कार करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मा. सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव मोकल, संजय मोकल आणि भाजपचे युवा कार्यकर्ते चंद्रकांत खंडू पाटील यांनी मेहनत घेतली. यावेळी अनिल मोकल, पांडुरंग पाटील, बाळाराम मोकल, संतोष पाटील, प्रकाश मोकल आदींसह नवतरूण करावी तरुण मंडळाचे असंख्य कायकर्ते तसेच ग्रामस्थ हजर होते. तसेच ज्या रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेची आवश्यकता भासली, त्यांना तातडीने पनवेल येथील लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट येथे नेऊन त्यांच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली.




### डॉ. महेश निमणे यांना पुरस्कार प्रदान

**पाताळगंगा** : सुखी वास्तू स्पिरिच्युअल सर्व्हिसेस या माध्यमातून जनसामान्यांचे घरगुती, व्यावसायिक, वैवाहिक, तसेच वास्तुदोष अशा अनेक समस्यांच्या चिंतेत असलेल्या व्यक्तीला उत्तम मार्ग दाखविण्याचे काम डॉ. महेश निमणे करीत आहेत. आजवर त्यांना तीसहून अधिक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना कै. रवळनाथ पवार फाऊंडेशन, चंदगड व ह्युमन राईट प्रेस पब्लिकेशन, बेळगाव यांच्यावतीने राष्ट्रीय समाजरत्न लोकसेवा पुरस्कार, हा लोकमान्य रंगमंदिर नाट्यगृह, रित्ज टॉकीज, कोनवाल गल्ली, बेळगाव येथे अभिनेत्री सानिका जोशी (माझी तुझी रेशीमगाठ) यांच्या हस्ते सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ देऊन प्रदान करण्यात आला.

# बलिदान अमर, स्मारक अनाथ



- माणगावातील स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मारकाची विदारक अवस्था
- शासन, प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष

**सलीम शेख**
**| माणगाव |**

माणगाव व तळा तालुक्याच्या मातीतून तब्बल ७७ स्वातंत्र्य सैनिकांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणाची आहुती दिली, तर अनेकांनी अमानुष कारावास, हालअपेष्टा व अन्याय सहन केला. त्यांच्या पवित्र स्मृती जपण्यासाठी माणगाव येथील जुन्या पंचायत समितीच्या आवारात उभारण्यात आलेले स्वातंत्र्य सैनिकांचे स्मारक आज मात्र शासन व प्रशासनाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे अक्षरशः विदारक अवस्थेत पोहोचले आहे.

स्वातंत्र्याला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त राज्य सरकारच्या पुढाकारातून हे स्मारक उभारण्यात आले होते. कालांतराने नवीन तहसील कार्यालय सुरू झाल्यानंतर स्मारक स्थलांतरित करण्यात आले. मात्र, तयानंतर या स्मारकाकडे कोणत्याही लोकप्रतिनिधीने किंवा शासकीय यंत्रणेने ढुंकूनही पाहिले नाही, ही धक्कादायक बाब समारे आली आहे.

आज स्मारकाच्या परिसरात गवताचे साम्राज्य, कचरा आणि अस्वच्छता दिसू येते. स्मारकावर कोरलेली स्वातंत्र्य सैनिकांची नाव धुळीच्या जाड थराखाली झाकली गेली असून, अनेक ठिकाणी अक्षरे अस्पष्ट झाली आहेत, तर काही नावे पूर्णपणे अदृश्य होण्याच्या मार्गावर आहेत. ज्यांनी देशासाठी हसत-हसत बलिदान दिले, तुरुंगवास भोगला, अतयाचार सहन केले, त्यांच्याच नावांचा सन्मान पुसला जात आहे, हे दृश्य अत्यंत वेदनादायक आहे.

दुर्दैवाची बाब म्हणजे, या स्मारकात ज्यांची नावे कोरलेली आहेत, त्यांपैकी बहुतांश स्वातंत्र्य सैनिक आज हयात नाहीत. जिवंत असताना अपेक्षित मान-सन्मान न मिळालेल्या या देशभक्तांच्या स्मृतींनाही मृत्यूनंतर उपेक्षा सहन करावी लागत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

ज्या स्वातंत्र्यामुळे आज आपण मुक्त श्वास घेतो, त्या स्वातंत्र्याच्या शिल्पकारांनाच विसरणे हे राष्ट्र म्हणून आपले अपयश नाही का? असा थेट सवाल आता माणगावकर उपस्थित करत आहेत. या ऐतिहासिक स्मारकाचे तातडीने नूतनीकरण, नियमित स्वच्छता, संरक्षक व्यवस्था व योग्य देखभाल करण्यात यावी, तसेच स्वातंत्र्य सैनिकांच्या स्मृतींना पुन्हा सन्मानाचे स्थान मिळावे, अशी जोरदार व भावनिक मागणी तालुक्यातून होत आहे.

किमान आता तरी शासन व लोकप्रतिनिधींनी गाढ झोपेतून जागे होऊन ठोस पावले उचलावीत, अन्यथा स्वातंत्र्य सैनिकांच्या अपमानाविरोधात नागरिकांकडून तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही संतप्त नागरिकांकडून दिला जात आहे.

# निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज



**4205**
**अधिकारी व कर्मचाऱ्यांकरिता प्रशिक्षण**

**| पनवेल | प्रतिनिधी |**

पनवेल महापालिकेची निवडणूक पारदर्शक, निष्पक्ष व सुरळीतपणे पार पडावी, यासाठी निवडणूक प्रक्रियेत सहभागी असलेल्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठी महापालिका प्रशासन कामाला लागले आहे.

महापालिकेतील २० प्रभागनिहाय क्षेत्राकरिता ६६० मतदान केंद्र आहे. सहा निवडणूक निर्णय अधिकारी, ६८ क्षेत्रीय अधिकारी तसेच मतदान केंद्राध्यक्ष, सहायक मतदान अधिकारी, शिपाई आणि ६५ राखीव मतदान केंद्रांकरिता सुसज्ज अशी एकूण ७२५ पथके तैनात केली आहेत. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात प्रशिक्षण सत्र होणार आहे. प्रशिक्षणामध्ये निवडणूक प्रक्रियेतील जबाबदाऱ्या, आचारसंहिता, मतदान व मतमोजणी प्रक्रिया, कायदेशीर बाबी, ई.व्ही.एम. मशीन प्रत्यक्ष हाताळणी याबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

> **निवडणूक प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश म्हणजे कोणतीही त्रुटी, गोंधळ किंवा गैरप्रकार टाळून निवडणूक प्रक्रिया विश्वासार्ह व पारदर्शक ठेवणे हा आहे. प्रशिक्षणाची तारीख, वेळ व ठिकाण याची माहिती संबंधित सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांना स्वतंत्रपणे कळविण्यात आली आहे. प्रशिक्षणाकरिता महापालिकेने पूर्वतयारी केली असून अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती बंधनकारक आहे. अनुपस्थित राहणाऱ्या किंवा आदेशांचे पालन न करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. - मंगेश चितळे, आयुक्त तथा निवडणूक अधिकारी, पनवेल**

## ओमकार वाचनालयाचे उद्घाटन



**| चिरनेर | प्रतिनिधी |**

महाविद्यालयीन जीवनात मी लायब्ररीत बसून अनेक पुस्तकांचा फडशा पाडला. त्यामुळे साहजिकच वाचनाची गोडी लागली. आजही सर्व वृत्तपत्रांबरोबर विमान प्रवासातही पुस्तके वाचतो. चौकमध्ये १९२० पासून वाचनालय सुरू आहे. त्याला १०६ वर्षांचा ऐतिहासिक वारसा आहे. ही अत्यंत अभिमानाची बाब असून, तुपगावमध्ये ओमकार वाचनालय व ग्रंथालय सुरू करून आपण एक उत्तम काम केले आहे, असे गौरवोद्गार आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्र घरत त्यांनी काढले.

तुपगाव चौक येथील ओमकार वाचनालय व ग्रंथालयाचे उद्घाटन रविवारी (दि.२८) झाले. यावेळी घरत हे उद्घाटनपर भाषणात बोलत होते. तर, व्यासपीठावर माजी जि.प. सदस्य मोतीराम ठोंबरे, काँग्रेस युवा अध्यक्ष निखिल ढवळे, तालुकाध्यक्ष देविदास म्हात्रे, राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष संतोष बैलमारे, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विनायक देशमुख, उद्योजक आप्पा देशमुख, विनोद भोईर, दिनेश गावडे आदीजण उपस्थित होते. माजी सरपंच शांताराम भधे यांनी प्रास्ताविक तर सुरेश मागावकर यांनी सूत्रसंचालन केले.

# उरणचा उपनगराध्यक्ष कोण?

**बहुमत भाजपकडे, अध्यक्षपद महाविकास आघाडीकडे; सत्तासंघर्ष तीव्र**

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण नगरपालिकेची निवडणूक नुकतीच पार पडली असून, नगराध्यक्षपदी महाविकास आघाडीच्या भावना घाणेकर यांची निवड झाली आहे. मात्र, २१ सदस्यांच्या नगरपालिकेत भाजपचे १२ तर महाविकास आघाडीचे ९ नगरसेवक निवडून आल्याने नगरपालिकेतील सत्तासमीकरण वेगळेच चित्र उभे राहिले आहे. नगराध्यक्षपद महाविकास आघाडीकडे असले तरी संख्याबळ भाजपकडे असल्याने आता उपनगराध्यक्षपदी कोणाची वर्णी लागणार, याकडे उरण शहराचे लक्ष लागून राहिले आहे.

उरण नगरपालिकेत भाजपचे बहुमत स्पष्ट असून, भाजपकडे १२ नगरसेवक असल्यामुळे उपनगराध्यक्षपदावर भाजपाचाच नगरसेवक बसण्याची शक्यता अधिक वर्तवली जात आहे. भाजपकडून उपनगराध्यक्षपदासाठी माजी नगराध्यक्ष रवी भोईर यांच्या नावाची चर्चा सुरू असली, तरी त्यांच्या नावाला पक्षातीलच काही नगरसेवक व पदाधिकाऱ्यांचा विरोध असल्याचे अधिकृत सूत्रांकडून समजते. त्यामुळे भाजपमध्ये अंतर्गत मतभेद उफाळून आले असून, काही पदाधिकारी नव्या व नवनिर्वाचित नगरसेवकाला उपनगराध्यक्षपद देण्यासाठी प्रयत्नशील असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

एकीकडे भाजपचे संख्याबळ, तर दुसरीकडे महाविकास आघाडीचे नगराध्यक्षपद आणि थेट राजकीय आव्हान, अशा परिस्थितीत उरण नगरपालिकेतील उपनगराध्यक्षपदाची लढत अधिकच रंगतदार बनली आहे. भाजप पक्षांतर्गत एकी टिकवतो की महाविकास आघाडी राजकीय खेळी करून धक्का देते, हे लवकरच स्पष्ट होणार आहे. त्यामुळे उरण नगरपालिकेच्या उपनगराध्यक्षपदी अखेर कोणाची वर्णी लागते, याकडे उरणच्या जनतेचे आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून राहिले आहे.

> **जनतेचे लक्ष**
> भाजपचे संख्याबळ अधिक असतानाही नगराध्यक्षपद हातातून गेल्याने शहरातील राजकीय समीकरणांमध्ये आधीच मोठा बदल झाल्याचे पाहायला मिळाले आहे. यावरुन सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये जोरदार राजकीय संघर्षही पाहायला मिळाला. त्यामुळे उपराध्यक्षपद कोणाच्या गळ्यात पडणार याकडे उरणकरांचे लक्ष लागले आहे.

## गुरुवारी अय्यप्पा महापूजा

**| पनवेल | प्रतिनिधी |**

नवीन पनवेल येथील वृंदावन बाबा अय्यप्पा भक्तवृंदा आणि वृंदावन बाबा भजन मंडळी यांच्यातर्फे २१ वि श्री श्री अय्यप्पा महापूजा गुरुवार, दि. १ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२.३० वाजता आयोजित करण्यात आली आहे.

या महापूजेत सकाळी ६ ते ७ वा., श्री महागणपती होम सकाळी ९.३० ते १२.३० वा., भजन कार्यक्रम (वृंदावन बाबा भजन मंडळ) दुपारी १२.३० वा, महामंगल आरती त्यानंतर तीर्थप्रसाद वाटप आणि सार्वजनिक महाप्रसाद दुपारी १ वा, सायं. ५ वा., यक्षागाना बयालाटा असे कार्यक्रम होणार आहे. तरी सर्व भक्तगणांनी या शुभकार्याला उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी व तीर्थप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# डम्पिंग ग्राऊंडमुळे आरोग्य धोक्यात

**कोल्हारे ग्रामस्थांकडून राजिपच्या सीईओंना निवेदन**




**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील नेरळ विकास प्राधिकरणामार्फत तीन ग्रामपंचायतींसाठी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभारण्याचा उद्देश होता. मात्र, सध्या या प्रकल्पाचा वापर केवळ नेरळ ग्रामपंचायतीकडून करण्यात येत असून, जमा होणाऱ्या कचऱ्यावर कोणतीही प्रक्रिया न करता थेट डम्पिंग ग्राऊंडमध्ये टाकला जात आहे. यामुळे कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

नेरळग्रामपंचायतहद्दीतीलडम्पिंग ग्राऊंडला वारंवार आग लागण्याचे प्रकार घडत असून, तया आगीतून निर्माण होणाऱ्या दुर्गंधीयुक्त धुरामुळे कोल्हारे, धामोते, बोपेले तसेच उल्हा नदीपलीकडील परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. या धुरामुळे श्वसनाचे विकार व इतर आरोग्य समस्यांचा धोका वाढल्याची तक्रार ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर कोल्हार ग्रामपंचायतीचे सरपंच महेश विरले यांनी पुढाकार घेत रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भासले यांची भेट घेऊन डम्पिंग ग्राऊंड तातडीने बंद करावे किंवा अन्य ठिकाणी हलवावे, अशी मागणी केली आहे. यावेळी कोल्हारे ग्रामपंचायत हद्दीतील विविध गावांतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यासंदर्भातील निवेदनही सीईओंना देण्यात आले.

डम्पिंग ग्राऊंमध्ये संध्याकाळच्या वेळेस कचारा जाळला जात असल्याचे प्रकार घडत असून, त्यामुळे संपूर्ण परिसरात दुर्गंधी पसरत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. यासंदर्भात सरपंच महेश विरले यांनी नेरळ ग्रामपंचायतीचे प्रशासकीय अधिकारी सुजित धनगर यांना कचरा जाळण्यास मनाई करण्याच्या सूचना दिल्या. तात्पुरत्या उपाययोजनेंतर्गत कचरा खड्डा करुन त्यात टाकण्यात येत असला, तरी कायमस्वरुपी उपाय म्हणून डम्पिंग ग्राऊंड स्थलांतरित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, डम्पिंगमधील कचऱ्याला आग नेमकी कशामुळे लागते, की ती जाणीवपूर्वक लागवली जाते, याचा तपास करुन दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी करत पोलिसांकडेही लेखी तक्रार देण्यात आली आहे.

धामोते हद्दीतील मॉर्निंग सोसायटीजवळील नाल्यालगत असलेल्या डम्पिंग ग्राऊंडमुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर धुराचा त्रास होत असून, याबाबत ग्रामस्नी कोल्हारे ग्रामपंचायतीकडे तक्रारी केल्या होत्या. त्याची गंभीर दखल घेत सरंपच महेश विरले, रोश संजय म्हसकर, सोमनाथ विरले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासकीय अधिकारी सुजित धनगर यांच्यासमवेत प्रत्यक्ष डम्पिंग ग्राऊंडची पाहणी करण्यात आली आणि तातडीने उपाययोजना करण्याची मागणी करण्यात आली.

## गोमांस विक्रीप्रकरणी तिसरा फरार आरोपी ताब्यात

- अँटॉप हिल येथून पनवेल पोलिसांनी केली अटक
- गुन्ह्यातील दोन आरोपींना आधीच ठोकल्यात बेड्या

**| पनवेल | प्रतिनिधी |**

बेकायदेशीररीत्या गोमांसाची वाहतूक करणाऱ्या वाहनासह पनवेल शहर पोलिसांनी दोन जणांना ताब्यात घेतले होते. यावेळी गाडीचा चालक सराईत गुन्हेगार फरार झाला होता. त्याला अँटॉप हिल येथून पनवेल शहर पोलिसांच्या विशेष पथकाने ताब्यात घेतले आहे. त्यामुळे आरोपींची संख्या तीन झाली आहे.

या गुन्ह्यामध्ये मोनिउद्दीन शेख (रा. शिवाजीनगर, गोवंडी), पासू उस्मान कुरेशी (रा. मानखुर्द) हे दोन आरोपी पूर्वीच पकडण्यात आले होते, तर फरार गाडी चालक आरोपी मोहम्मद अली अकबर अली शहा (रा. अँटॉप हिल, मुंबई) याला वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकातील तुषार बोरसे, मिथुन भोसले, संदेश म्हात्रे व शशिकांत काकडे यांनी कोणतीही तांत्रिक मदत नसताना तसेच कोणतीही पूर्व माहिती उपलब्ध नसतानाही, गोपनीय बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार कौशल्यपूर्ण तपास करून अँटॉप हिल येथून ताब्यात घेतले आहे. आरोपी हा सराईत गुन्हेगार असून, त्याच्याविरोधात मुंबई येथील विविध पोलीस ठाण्यांत विविध गुन्हे दाखल आहेत. त्याच्याविरोधात पनवेल शहर पोलिसांनी कारवाई केली आहे.

**माणगाव ग्रामपंचायतीतील प्रस्ताव प्रलंबित | आदिवासींमध्ये तीव्र नाराजी**

# आदिवासी वाड्यांचा रस्ता वनविभागाच्या कात्रीत

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील माथेरानच्या डोंगर परिसरात आदिवासी वाड्यांना जोडणारा रस्ता वनजमिनीतून जात असल्याने त्यासाठी आवश्यक असेलली वन विभागाची परवानगी मिळण्यात मोठा अडथळा निर्माण झालाआहे. या रस्त्यासाठीचा प्रस्ताव सादर होऊन तब्बल एक वर्ष उलटून गले असले तरी चारपैकी एका ग्रामपंचायतीतील रस्त्याच्या कामाला अद्याप मंजुरी मिळालेली नाही. त्यामुळे संपूर्ण रस्ता अखंडपणे पूर्ण होण्याबाबत साशंकता निर्माण झाली असून, आदिवासी नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.



माथेरानचे डोंगर परिसरात १३ आदिवासी वाड्या असून, नेरळ-माथेरान घाटरस्त्यातील जुम्मापट्टी धनगरवाडी ते किरवली वाडी या सुमारे १३ किलोमीटर अंतरात या आदिवासीवाड्या वसलेल्या आहेत. अनेक पिढ्यांपासून आदिवासी आणि धनगर समाज वास्तव्यास आहे. देशाच्या स्वातंत्र्यपूर्व काळापासून अस्तित्वात असलेल्या या वाड्या वन कायदा लागू झाल्यानंतर वन विभागाच्या अखत्यारित आल्या. त्यामुळे आजतागायत या भागात पक्कम रस्ते होऊ शकले नाहीत.

शासनाने राष्ट्रीय ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत रस्त्यासाठी निधी मंजूर केल्यानंतर वन जमिनीच्या परवानगीसाठी प्रस्ताव सादर करण्यात आले. किरवली, उमराली व आसल या ग्रामपंचायतींतील वन जमिनीचे प्रस्ताव जिल्हा उपवनसंरक्षक कार्यालयाने मंजूर केल्याने त्या भागातील रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. सध्या आषाणेवाडी व सावरगाववाडी दरम्यान रस्त्याचे काम सुरू आहे. मात्र, ग्रुप ग्रामपंचायत माणगाव वरेडी, बेकरेवाडी, असलवाडी, नाण्याचा माळ, मन्य धनगरवाडी व बेकरे धनगरवाडी या भागातील वन जमिनीच्या प्रस्तावाला अलिबाग येथील वन विभाग कार्यालयाने मंजुरी नाकारली आहे. त्यामुळे हा महत्त्वाकांक्षी रस्ता अर्धवट राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

वन विभागाच्या विलंबामुळे त्रस्त झालेल्या आदिवासी नागरिकांनी यापूर्वी श्रमदानातून पायवाटा तयार केल्या होत्या. आता पुन्हा एकदा आदिवासी कार्यकर्ते जैतू पारधी व गणेश पारधी यांनी स्थानिक ग्रामस्थांच्या सहकार्याने स्वतः आर्थिक भार उचलून नवीन वन प्रस्ताव तयार केला असून, तो अलिबाग येथील वन विभाग कार्यालयात सादर केला आहे. या प्रस्तावाला तातडीने मंजुरी द्यावी, अशी मागणी आदिवासी बांधवांकडून करण्यात येत आहे.

**रस्त्याचे एकूण अंतर**
- १३.५ किलोमीटर
- रस्त्यात चार ठिकाणी नाल्यावर पूल बांधावे लागणार
- लहान साकव यांची निर्मिती
- मंजूर वन जमिनीचे प्रस्ताव
- किरवली ग्रामपंचायत, उमरोली ग्रामपंचायत (वावरले ग्रामपंचायत), आसल ग्रामपंचायत

> **आमच्या हक्काचा रस्ता देश स्वतंत्र झाल्यानंतर ७५ वर्षाहन्नी बनतो आहे, मात्र वन जमिनीतून रस्ता बनविण्याचा ३/२ प्रस्ताव मंजूर न केल्यास या भागातील रस्ता होणार नसलेल्या पाच आदिवासी वाडीतील आदिवासी समाज स्थानिक स्वराज्य संस्थेचे निवडणुकीत बहिष्कार टाकणार आहेत.**
> **- गणेश पारधी, आदिवासी कार्यकर्ते**

- रस्त्यादरम्यान असलेल्या ग्रामपंचायती : किरवली, माणगाव तर्फे वरेडी, उमरोली, आसल
- आदिवासी वाड्या : किरवली वाडी, आषाणेवाडी, सावर गाववाडी, बोरीचीवाडी, मना धनगर वाडा, धामणदांड, चिंचवाडी, सागाचीवाडी, आसलवाडी, नाण्याचा माळ, बेकरेवाडी, जुम्मापट्टी धनगरवाडी या वाड्या आहेत.

## प्रदूषणाचा कहर

भारत हा उष्ण कटिबंधातील देश आहे. त्यामुळे तेथे पावसाळा आणि हिवाळा हे लोकांना हवेहवेसे वाटणारे ऋतू आहेत. पूर्वी पाऊस आल्याने शेते कशी बहरतात, जिकडेतिकडे कशी हिरवाई आणि धबधबे दिसतात याची वर्णने केली जात. आता पावसाळा म्हणजे अतिपावसामुळे उडणारा हाहाकार, पूर, डोंगर कोसळणे, रस्ते उखडणे अशी समीकरणे तयार झाली आहेत. मराठवाड्यासारख्या दुष्काळी भागात किंवा राजस्थानच्या वाळवंटी प्रदेशात यंदा आलेले पूर हे अभूतपूर्व होते. मुंबई, दिल्ली, बंगळुरुसारख्या शहरांमध्ये तर दरवर्षी पावसात भयंकर दुर्घटना वा नुकसान होऊ लागले आहे. हिवाळा हाही त्याच वाटेने जाऊ लागला आहे. पूर्वी हिवाळा व थंडी यांची लोकांना प्रतीक्षा असे. गरम कपडे घालण्याची ती एकमेव संधी असे. पण आता हिवाळ्यातील प्रदूषणाने सगळ्यांची झोप उडवली आहे. राजधानी दिल्ली ही जगातील सर्वात प्रदूषित शहरांपैकी एक आहे. एरवीही तिथली हवा घाणेरडीच असते. पूर्वी हिवाळ्यात तेथे अनेक संमेलने होत. परिषदा भरत. संगीत महोत्सवांच्या आयोजनांची अधिक चर्चा होई. आता तेथे एअर क्वालिटी इंडेक्स, एक्यूआय किती आहे याविषयीच लोक अधिक बोलतात. जसा महागाईचा निर्देशांक असतो तसा एक्यूआय हा हवेच्या दर्जाचा निर्देशांक आहे. हवेत प्रदूषण करणाऱ्या आठ घटकांचे प्रमाण यात मोजले जाते. दहा मायक्रोमीटरपेक्षा कमी व्यासाचे कण आणि नायट्रोजन डायऑक्साईड, कार्बन मोनॉक्साईड, सल्फर डाय ऑक्साईड, अमोनिया यांच्यासारखे अत्यंत विषारी वायू इत्यादींचा समावेश असतो. यानुसार या सर्व घटकांचे प्रमाण कमी असेल तर हवा शुध्द म्हणजे ० ते ५० या दरम्यान असते. हे प्रमाण जसजसे वाढत जाते तसतशी हवा अशुध्द वा प्रदूषित ठरते. दिल्लीमध्ये एरवीदेखील हा एक्यूआय १५० वगैरेंच्या आसपास म्हणजे घातक पातळीवर असतो. हिवाळ्यात वारे मंदावतात आणि धुके व दव यांमुळे प्रदूषण करणारे घटक जमिनीलगतच्या हवेत अडकून पडतात. यामुळेच एक्यूआय वाढत जातो. यंदा हिवाळा सुरू झाल्यापासून दिल्लीचा एक्यूआय किमान ३५० ते कमाल ५०० या दरम्यान फिरत राहिला. ही प्रदूषणाची अतिशय भीषण पातळी होय.

### मुंबईतही विषारी हवा

मुंबई हे समुद्राच्या काठी असल्याने व समुद्रावरून येणारे व समुद्राकडे वाहणारे वारे वर्षभर सतत वाहत असल्याने प्रदूषण अलिकडपर्यंत कमी असे. शिवाय, मुंबईत लोकल रेल्वे या सार्वजनिक वाहतुकीचा सर्वाधिक वापर होत असलाने इतकी वर्षे ही पातळी तुलनेने खाली राहत असे. पण आता मुंबईदेखील दिल्लीशी स्पर्धा करू लागली आहे. सोमवारी मुंबईचा एक्यूआय सरासरी १५० च्या आसपास होता. नवी मुंबईत तर हा आकडा २०० ते ३०० च्या दरम्यान गेला होता. दिल्ली किंवा मुंबई ही मुख्य शहरे असल्याने त्यांची किमान चर्चा तरी होते. पण अन्य शहरे, छोटी गावे इथेही प्रदूषण होत असते. ते नजरेस येत नाही वा मोजले जाऊन त्यांच्या बातम्या होत नाहीत. अलिबागसारख्या ठिकाणी अजूनही बरीचशी झाडी शिल्लक असल्याने प्रदूषण कमी असल्याचे वाटते. पण हवेतील एक्यूआय मोजला तर तेथेही तो घातक पातळीच्या आसपास असल्याचे आढळेल. रस्त्यावरची वाढती वाहतूक, बांधकामे आणि उद्योगधंदे यामुळे हे प्रदूषण वाढू लागले आहे. हॉटेल व बेकऱ्यांमधून बाहेर पडणारा धूर, मोठी मंदिरे, मठ इत्यादी ठिकाणी लावल्या जाणाऱ्या धूप, अगरबत्त्या, केले जाणारे यज्ञ इत्यादींमुळेही भरपूर प्रदूषण होते. ग्रामीण भागात पेटवल्या जाणाऱ्या चुली, जाळले जाणारे टायर इत्यादींमुळे विषारी वायू वा धूर बाहेर पडतो. तेथे वस्ती कमी असल्याने हे प्रदूषण सहजी लक्षात येत नाही. पण ते चांगलेच त्रासदायक असते. काही वर्षांपूर्वी दिल्लीतील प्रदूषण कमी करण्यासाठी न्यायालयाने हस्तक्षेप केला व पंधरा वर्षांवरील वाहने सक्तीने बंद करण्याचा निर्णय घेतला. नंतर बॅटरीवर चालणाऱ्या बसेस आल्या. यामुळे प्रदूषण काही प्रमाणात कमी झाले. मात्र आता संगणक किंवा विजेवरच्या वाहनांमध्ये वापरल्या जाणाऱ्या व कालांतराने फेकल्या जाणाऱ्या बॅटऱ्यांमधून होणारे प्रदूषण ही डोकेदुखी ठरली आहे. आता नवीन व इलेक्ट्रिकवर चालणाऱ्या गाड्यांची संख्या वाढली तरीही दिल्लीमध्ये इतर कारणांनी होणारे प्रदूषण वाढले आहे.

### जे शहरात, तेच गावांमध्ये

मुंबईत सध्या सर्वत्र प्रचंड बांधकामे चालू आहेत. मेट्रोचे प्रकल्प, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प, जमिनीखालून वा वरून रस्ते किंवा पूल अशांची एकच गर्दी उडाली आहे. यामुळे होणारे धुळीचे व आवाजाचे प्रदूषण हे वेड लावणारे आहे. मुंबईची हवा आधीच दमट असते. इथे थंडीही फार नसते. त्यात आता हवाही मोकळी न राहिल्याने दमा व श्वसनाचे इतर विकार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. भारतात दरवर्षी सुमारे वीस लाख मृत्यू हे प्रदूषणाशी संबंधित गोष्टींमुळे होतात असा जागतिक अभ्यास आहे. याखेरीज वायू प्रदूषणामुळे भारतातील माणसांचे आयुष्यमान सुमारे साडेतीन वर्षांनी कमी झाले आहे. मोदींच्या अच्छे दिनमध्ये या कशाचाच उल्लेख नाही. रामाचे देऊळ बांधणे किंवा ३७० वे कलम रद्द करणे हाच केवळ त्यांच्या लेखी पराक्रम आहे. पण प्रदूषणाचा प्रश्न किमान मान्य करायलाही हे तयार नसतात. मध्यंतरी छट पुजेच्या वेळी धार्मिक विधिंसाठी एक वेगळे छोटे तळे उभारण्यात आले व दिल्लीकरांसाठी यमुना किती शुध्द झाली अशी थापाथापी करण्यात आली. प्रत्यक्षात महापालिकेने शुध्द केलेले पाणी टँकरमधून आणून या तळ्यात टाकले जात होते हे दडवण्यात आले. यमुना नदीतील प्रचंड घाणेरडा फेस येणाऱ्या पाण्याची सर्वत्र चर्चा असताना या तळ्यातले पाणीच तेवढे शुध्द कसे असा ओरडा झाला. मग काही पत्रकारांनी सत्य शोधून काढले. मुद्दा असा की, प्रदूषणाचा प्रश्न हा राजकारणाचा मुद्दा नाही. मोदी प्रशासनावर याबाबत टीका होत असली तरी प्रदूषणाला अनेक कारणे जबाबदार आहेत हे सर्वांना कळते. पण आपण अत्यंत स्वच्छ व कार्यक्षम आहोत हे दाखवण्याच्या अट्टहासापायी जनतेची फसवणूक करण्याचा मार्ग स्वीकारला जातो. पूर्वी दिल्लीत आम आदमी पक्षाचे सरकार असताना भाजपवाले दिल्लीतील प्रदूषणाला केजरीवाल जबाबदार असल्याचे म्हणत असत. आता केंद्रात, दिल्ली विधानसभेत आणि दिल्ली महापालिकेत सर्वत्र भाजपची सत्ता आहे. पण प्रदूषणावर इलाज होण्याऐवजी हा प्रश्न आणखी वाढला असून भाजपवाले त्यावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करीत आहेत. मुंबईत कधीतरी मध्येच रस्त्यांवर पाणी मारणे वगैरेंसारखे दिखाऊ उपाय केले जातात. पण शहरातील वाढलेली मोटारींची संख्या आणि प्रचंड बांधकामे यामुळे मुंबईची हवा कायम खराब राहू लागली आहे. देवदयेने मुंबईत भरपूर पाऊस पडत असल्याने तेवढ्यापुरती हे प्रदूषण खाली येते. पुणे, नागपूर, नाशिक, संभाजीनगर व त्याहून छोट्या शहरांमध्ये तर याहून भयंकर अवस्था आहे. दुर्दैवाची बाब म्हणजे त्यांची ना माध्यमांमध्ये चर्चा आहे ना, निवडणुकीत यावरून जनता राजकारण्यांना याबाबत जाब विचारते आहे.

**। विचार**

# तांदूळनिर्यातीला वेसण कशासाठी?

*भारताशी चाललेले शुल्क युद्ध, रशियाकडून भारत करत असलेली कच्च्या तेलाची आयात आणि त्या पार्श्वभूमीवर रशियाचे अध्यक्ष पुतिन यांचा अलिकडेच झालेला भारत दौरा या घटनांनी हवालदिल झालेल्या अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी आता भारताच्या तांदूळ निर्यातीला वेसण घालण्याची नवी खेळी केली आहे. त्याद्वारे त्यांनी भारताला एका नवीन मुद्द्यावरून घेरण्याचा प्रयत्न केला आहे.*



**मुकुंद गायकवाड**

भारत आणि अमेरिका यांच्यात अनेक दशकांपासून व्यापारविषयक वाद असले तरी, ज्याला व्यापकपणे शुल्क युद्ध म्हटले जाते, तो काळ २०१९ मध्ये राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रशासनाखाली सुरू झाला. १ ऑगस्ट २०१९ पासून अमेरिकेने बहुतेक भारतीय आयातीवर सुरुवातीला २५ टक्के शुल्क आकारण्याची घोषणा केली. मात्र त्यामुळे भारतावर काही परिणाम होत नाही, हे पाहून २७ ऑगस्ट २०१९ रोजी अतिरिक्त २५ टक्के शुल्क लागू केले. यामुळे बहुतेक भारतीय वस्तूंवरील एकूण शुल्क ५० टक्के झाले. अमेरिकेने विविध व्यापार कायद्यांनुसार या शुल्कांचे समर्थन केले आणि भारताने तेलाची सतत खरेदी केल्याने युक्रेनविरुद्ध चाललेल्या युद्धामध्ये रशियाची एक प्रकारे मदत केल्याचा आरोप लावला. रशियाकडून कच्च्या तेलाची आयात थांबवण्यासाठी अमेरिका भारताला आग्रह करण्याचे मुख्य कारण म्हणजे युक्रेनमधील युद्धासाठी मॉस्कोला मिळणारा महसूल मर्यादित करणे होय. पाश्चात्य खरेदीदारांनी मोठ्या प्रमाणात रशियन तेल टाळल्यामुळे मॉस्कोने चीन आणि भारताला दिलेल्या सवलती आणि स्वस्त किंमतीचा फायदा घेत भारताने अल्पावधीतच रशियन कच्च्या तेलाची एकूण आयात सुमारे ४० टक्क्यांपर्यंत नाट्यमयरित्या वाढवली. अमेरिकेची पोटदुखी वाढण्याचे हे मूळ कारण आहे. पण भारताने अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता रशियाकडून मिळत असलेल्या कच्च्या तेलाची खरेदी थांबवली नाही. त्यामुळे चिडलेल्या ट्रम्प यांनी आंतरराष्ट्रीय व्यापारात अमेरिकेसोबत करार करण्यास भारतावर येनकेनप्रकारे दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. त्याला न बधलेल्या भारताला त्यांनी एका नवीनच मुद्द्यावरून घेरण्याचा प्रयत्न केला आहे.

ट्रम्प यांनी नुकताच भारताने बासमती तांदुळाचे डम्पिंग केल्याचा आरोप करत भारतीय आयात मालावर शुल्क वाढवण्याची धमकी दिली. व्हाईट हाऊसमध्ये आयोजित एका गोलमेज परिषदेत ट्रम्प बोलत होते. त्यांनी परिषदेत म्हटले की भारताला अमेरिकेत तांदळाचे 'डंपिंग' करण्याची परवानगी दिली जाऊ नये. तसेच भारताने (तांदळाचे) डंपिंग करू नये. आंतरराष्ट्रीय व्यापार नियमानुसार ते असे करू शकत नाहीत. त्यांच्या म्हणण्यानुसार भारतावर नवीन शुल्क आकारणे हा या समस्येवर एक जलद आणि सोपा उपाय असेल, कारण बेकायदेशीरपणे माल पाठवणाऱ्या देशांवर शुल्क लादल्यास ही समस्या सोप्या पद्धतीने सोडवली जाईल. काही अमेरिकन शेतकऱ्यांनी तक्रार केली की भारत, व्हिएतनाम आणि थायलंडसारख्या देशांमधून होणाऱ्या स्वस्त आयातीमुळे त्यांनी पिकवलेल्या तांदळाच्या किंमती कमी होत आहेत. त्यामुळे अमेरिकेने शेतकऱ्यांसाठी एका संघीय मदत पॅकेजची घोषणा केली होती. भारत अमेरिकेत निर्यात करत असलेल्या तांदळाबद्दल भारतीय निर्यातदार आणि विश्लेषकांचे म्हणणे आहे की, बासमती हा एक विशेष प्रकारचा तांदूळ आहे, जो अमेरिकेत पिकवलेल्या तांदळाचा थेट पर्याय नाही आणि म्हणूनच डंपिंगचा दावा त्यांना मान्य नाही. कारण बासमती तांदळाचा व्यापार विशिष्ट ग्राहकांच्या आवडीनिवडींवर (विशेषतः दक्षिण आशियाई समुदायावर) आधारित आहे. धान्य किंवा इतर कृषी उत्पादनांच्या संदर्भात डंपिंग म्हणजे निर्यातदार देश किंवा कंपनीने आपले उत्पादन संबंधित देशांतर्गत बाजारातील किमतीपेक्षा कमी दराने विकणे. अशा देशात धान्य आयात करणाऱ्या देशात उत्पादनाची किंमत किंवा उत्पादन खर्च तुलनेने जास्त असतो. (जे शेतीच्या बाबतीत अनेकदा सर्वात प्रभावी स्वरूप असते). गेले दोन महिने ट्रम्प हे सारखे अहंपणाची भाषा वापरून भारतावर काही ना काही लादण्याची गरळ ओकत आहेत. वास्तविक, या बातमीने आंतरराष्ट्रीय बाजारात भारताची बाजू भक्कम झाल्याचे सहज समजू शकते. कारण अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धानंतर आजवर जगाची अर्थव्यवस्था आपल्या मुठीत ठेवण्यासाठी अथक प्रयत्न केले आहेत. आपल्या उद्योगांना संरक्षण देण्यासाठी अमेरिकेने इंटरनॅशनल मॉनिटरी फंड आणि इंटरनॅशनल ट्रेड ऑर्गनायझेशन या संस्थांची निर्मिती केली. १९८०-९० च्या दशकात वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन निर्माण केले. या ऑर्गनायझेशनच्या माध्यमातून शेतीचा व्यापार कसा केला जावा याची नियमावली तयार केली गेली. या नियमावलीअंतर्गत कोणत्याही देशाने दुसऱ्या देशात माल डम्पिंग करून स्थानिक शेतकऱ्यांना तोटा होईल अशी कृती करू नये, असे निर्बंध घालण्यात आले आहेत. ट्रम्प यांनी भारतावर सर्वाधिक टेरिफ लादले असूनही भारत अमेरिकेमध्ये बासमती तांदूळ डम्पिंग करतो, हे नक्कीच भूषणावह आहे. याची दखल माध्यमांनी आणि तज्ञ लोकांनी घेऊन पंतप्रधान मोदींची पाठ थोपटायला हवी होती, परंतु आर्थिक अभ्यासाअभावी ही महत्वाची बातमी दुर्लक्षित राहिली. तसा विचार करता गहू आणि तांदूळ ही दोन्ही पिके अनुक्रमे इजिप्त आणि चीनमध्ये निर्माण झाली होती. अमेरिकेने गव्हाच्या बाबतीत क्रांती केली आणि भारताने बासमती तांदूळ पिकवत वाद निर्माण करून या क्षेत्रामध्ये उज्वल यश संपादित केले आहे. बासमती तांदळाला जगभर मागणी असल्याने भारताच्या शेतीक्षेत्रातील चहा बरोबरच बासमती तांदळालाही अनन्य महत्व प्राप्त झाले आहे. बासमती तांदळाची जात प्रामुख्याने पंजाब आणि हरियाणा प्रांतात पिकवली जाते आणि भारतातील पहिली आणि एकमेव हरित क्रांती याच दोन प्रांतां मध्ये झाली होती. वास्तविक, भारताने शेतीमालाच्या निर्यातीसाठी 'आग्रेस्को' नावाची संस्था निर्माण केली आहे. त्यामध्ये ५१ टक्के वाटा हा शेतकऱ्यांचा आणि ४९ टक्के सरकारी वाटा अशी पद्धत राबवली गेली आहे. या संस्थेअंतर्गत सरकारी शेतीतज्ञ जगातल्या बाजारपेठेचा अभ्यास करून जास्तीत जास्त दर कोणत्या वेळी आणि कोणत्या मालाला मिळतो याची माहिती संस्थेला देतात. संस्था तेवढाच शेतमाल उत्पादित करून परदेशांना निर्यात करतात.

इस्रायल हा वालुकामय प्रदेश आहे, परंतु या संस्थेमुळे तेथील मालाला जास्तीत जास्त दर मिळत असल्याने इस्राएलचा शेतकरी सधन झाला आहे. आपल्याकडे तशी कोणतीही तरतूद नसताना भारताने अमेरिकेमध्ये बासमती तांदूळ डंपिंग करून अमेरिकन शेतकऱ्यांच्या नाकी नऊ आणले आहेत. त्यामुळे होणारा ट्रम्प यांचा थयथयाट पाहता भारताने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे जसे पाकला नमवले होते, त्या पद्धतीने 'ऑपरेशन बासमती' करून अमेरिकेलाही नमवले आहे असे स्पष्ट होते. शेतीक्षेत्रामध्येच नव्हे, तर अनेक क्षेत्रांमध्ये अमेरिका आघाडीवर आहे. परंतु व्हिएतनामच्या हो चीनिव्ह यांनी शिवाजी महाराजांच्या गनिमी काव्याच्या तंत्राचा वापर करून अमेरिकेला दाती तृण धरून शरण यायला भाग पाडले होते आणि त्यावेळी शिवाजी महाराजांचे नाव घेऊन आम्ही हे तंत्र वापरले म्हणून सांगितले होते. आपण छत्रपतींचा अभिमान बाळगतो, पण अशा महत्वाच्या ऐतिहासिक विधानांकडे दुर्लक्ष करतो. डंपिंगबाबत वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशनने म्हटले आहे की डंपिंग तंत्राचा वापर करून कोणत्याही देशाने दुसऱ्या देशातील शेतकऱ्यांचे नुकसान करू नये. ते व्यापार तंत्राच्या विरोधी होईल आणि निषिध्द मानले जाईल. डंपिंगमध्ये एखादा देश दुसऱ्या देशात इतका शेतमाल निर्यात करतो की दुसऱ्या देशातील भाव एकदम कोसळून तेथील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होते. या पार्श्वभूमीवर भरपूर शुल्क लादले गेले असतानाही बासमती तांदूळ इतक्या मोठ्या प्रमाणात अमेरिकेच्या बाजारात कसा पोहोचला, याची सविस्तर माहिती उपलब्ध झाल्यास प्रत्येक भारतीयाला 'ऑपरेशन सिंदूर'सारखाच याही घटनेचा अभिमान वाटल्याशिवाय राहणार नाही. अमेरिकन शेती आणि उत्पादन मोठे असले तरी तेथील फक्त दोन टक्केच नागरिक शेती करतात. त्यांचे क्षेत्र मोठे असते, शिवाय उत्पादन खर्च जास्त असतो. त्या तुलनेत भारतीय शेतकरी नगण्य असूनही आपल्या कौशल्याने आणि मेहनतीने जास्तीत जास्त उत्पादन काढून देशाला अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण करतो. पूर्वीच्या काळासारखी या देशाला अमेरिकेकडे अन्नधान्यासाठी भीक मागावी लागत नाही.

# बांगलादेशपासून भारताला सतर्क राहण्याची गरज

**सुयोग आंग्रे**

बांगलादेशात मारले गेलेले विद्यार्थी नेते उस्मान हादीच्या भावाने मोहम्मद युनूस सरकारला त्याच्या हत्येप्रकरणी ज्या प्रकारे गोत्यात उभे केले, त्यावरून या प्रकरणात भारताची बदनामी करण्याचा सुनियोजित प्रयत्न करण्यात आल्याचे स्पष्ट होते.

बांगलादेशात हादीला गोळ्या घालणारी व्यक्ती भारतात पळून गेल्याची अफवा अनेक दिवस पसरत राहिली, पण तिथले सरकार आणि पोलिसांनी यावर काहीही न बोलणेच बरे मानले. हादीचा मारेकरी भारतात लपल्याची अफवा पसरल्याने तेथे अशांतता पसरली आणि प्रसारमाध्यमांसह हिंदूनाही लक्ष्य केले जाऊ लागले, तेव्हाच हादीचा मारेकरी बांगलादेशात कुठेतरी लपून बसल्याचे स्पष्ट झाले. भारतविरोधी भावनेने मर्यादा ओलांडल्या आणि बांगलादेशही त्याच्या प्रभावाखाली आला आणि अंतरिम सरकारच्या क्षमतेवर प्रश्न उपस्थित केल्यामुळे हे स्पष्टीकरण देण्यात आले असे मानण्यास चांगली कारणे आहेत.

बांगलादेशात नेहमीच भारतविरोधी घटक राहिले आहेत, पण शेख हसीना यांनी भारतात आश्रय घेतल्यानंतर त्यांना मोकळा हात दिला गेला.

अंतरिम सरकारचे प्रमुख या नात्याने मोहम्मद युनूस यांनी भारतविरोधी घटकांना केवळ सर्रासपणे चालवण्याची परवानगी दिली नाही तर त्यांनी स्वत: वेळोवेळी प्रक्षोभक विधाने केली. बांगलादेशातील हिंदूंच्या छळाला त्यांनी कधी भारताचा अपप्रचार म्हटले तर कधी चीनला ईशान्येत सक्रिय होण्याचे निमंत्रण दिले.

बांगलादेशात कहर करणाऱ्या पाकिस्तानशी सहकार्याची प्रक्रियाही त्यांनी सुरू केली. तसेच त्यांनी जमात-ए-इस्लामी आणि इतर अशा भारतविरोधी कट्टरतावादी संघटनांच्या पाठीवर हात घातला.

बांगलादेशातील सध्याची परिस्थिती शेख हसीना सरकार उलथून टाकल्यानंतर दिसते तितकीच धोकादायक आहे. त्या काळात हिंदूंवर भीषण हल्ले झाले. त्यांच्या घरांसह दुकाने, मंदिरांनाही लक्ष्य करण्यात आले. त्यावेळीही अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनी अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठी आश्वासने दिली होती आणि आताही देत आहेत, मात्र ती पोकळ ठरत आहेत. बांगलादेश हा सध्या पाकिस्तानसारखा नाही हे खरे असले तरी आता तसे होण्याची शक्यता आहे, कारण एकीकडे निवडणुकांसोबतच संविधान बदलाबाबत फेब्रुवारीत सार्वमत घ्यायचे आहे आणि दुसरीकडे बांगलादेशला पूर्णपणे इस्लामिक देश बनवू पाहणारे असे घटक बोलका होऊ लागले आहेत. काही जण शरियतची अंमलबजावणी करण्याची मागणी करत आहेत. बांगलादेशात गेल्या काही वर्षांत जिहादी घटकांची संख्या वाढली आहे. तिथे अल कायदा आणि इस्लामिक स्टेटसारख्या दहशतवादी गटांना पाठिंबा देणारे लोक झपाट्याने वाढले आहेत. अशा घटकांना लगाम घालण्याऐवजी मोहम्मद युनूस यांच्या सरकारने त्यांना तुरुंगातून सोडवण्याचे काम केले. असे करून त्यांनी धर्मांधतेचे जिन्न बाहेर काढले, ज्याला शेख हसीना बंदिस्त ठेवत असत. त्यामुळे उर्वरित धर्मनिरपेक्ष मूल्येही धोक्यात आली आहेत. तेथे महिलांना बुरखा घालण्यास सांगितले जात आहे आणि गाणे, वाजवणे हराम असल्याचे सांगितले जात आहे. या कारणास्तव, सांस्कृतिक केंद्र छायनटवर नुकत्याच झालेल्या हल्ल्यात वाद्ये नष्ट झाली. बांगलादेशात भारताचा विरोध वाढत असताना हिंदूंवरील संकटही वाढत आहे. बांगलादेशात स्थापन होणाऱ्या नव्या सरकारमध्ये मूलतत्त्ववादी घटक भागीदार झाले, तर तेथील हिंदू आणि इतर अल्पसंख्याकांचे जगणे अधिक कठीण होईल. बांगलादेशात निर्माण होत असलेले भारतविरोधी वातावरण हा एका मोठ्या कटाचा भाग आहे आणि या कटात मोहम्मद युनूस आणि त्यांचे सरकारचे सहकारी सहभागी नसतील, तर ते निदान त्याकडे दुर्लक्ष करत आहेत, असा निष्कर्ष काढण्यास पुरेशी कारणे आहेत. शेख हसीना यांच्याबद्दल चिडचिड झाल्यामुळे ते भारतासोबतचे संबंध बिघडवण्याच्या नादात आहेत असे दिसते.

युनूस नक्कीच नोबेल पारितोषिक विजेते आहेत, परंतु भारताला त्याच्या वृत्तीबद्दल सावधगिरी बाळगावी लागेल आणि बांगलादेशात आपल्या हिताच्या विरोधात सुरू असलेल्या कामात पाकिस्तानसह तुर्की आणि पाश्चात्य देशांचाही सहभाग आहे हे पाहावे लागेल. बांगलादेशातील कट्टरतावादी शक्तींच्या धोकादायक उदयाबाबत पाश्चात्य देश, विशेषत: अमेरिका आणि युरोप कसे मौन बाळगून आहेत याकडे दुर्लक्ष करता येणार नाही. अशा परिस्थितीत भारताला बांगलादेशातील घडामोडींबाबत सतर्क आणि सतर्क राहण्याबरोबरच आपले मुत्सद्दी कौशल्य दाखवावे लागेल. एकीकडे बांगलादेश भारतात घुसखोरी करीत आहे. ही घुसखोरी निव्वळ रोजगार आणि सुरक्षेसाठीच केलेली अनेकदा समोर आले आहे. आजवर बांगलादेशी नागरिकांवर केलेली कारवाई ही लक्षवेधी नसली तरी आता घडणाऱ्या घटनांमुळे बांगलादेशीच्या कारवायांवर लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

**लोकसंसद**

## पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण, भारतरत्न हे नागरी पुरस्कार पदव्या नाहीत

मुंबई उच्च न्यायालयाने नुकतेच एका याचिकेच्या प्रकरणाच्या शीर्षकाची नोंद घेताना म्हटले आहे की 'पद्मश्री, पद्मभूषण, पद्मविभूषण आणि भारतरत्न' हे सर्वोच्च नागरी पुरस्कार पदव्या नाहीत आणि त्यामुळे ते पुरस्कार विजेत्यांच्या नावापुढे किंवा नावामागे लावले जाऊ नयेत. यासंदर्भात उच्च न्यायालयाने १९९५ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाच्या निर्णयाचा हवाला दिला. त्या निर्णयात सर्वोच्च न्यायालयाने स्पष्टपणे म्हटले होते की, पद्म पुरस्कार आणि भारतरत्न हे अनुच्छेद १८ (१) च्या अर्थानुसार 'पदव्या' नाहीत आणि ते नावापूर्वी किंवा नंतर वापरले जाऊ नयेत. वास्तविक पद्म पुरस्कारप्राप्त अनेक ख्यातनाम व्यक्ती सार्वजनिक जीवनात वावरताना आपल्या नावापुढे पद्म पुरस्कारांचा उल्लेख करीत असल्याचे आढळून आले आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या पद्म पुरस्कारांच्या वापराबद्दलचे हे निरीक्षण पद्म पुरस्कारप्राप्त व्यक्ती लक्षात घेतील आणि आपल्या नावापुढे आणि नावामागे पद्म पुरस्कारांचा उल्लेख करण्याचे टाळतील अशी अपेक्षा आहे. देशात पद्म पुरस्कारांची सुरुवात १९५४ मध्ये झाली असून वर्ष २०२५ पर्यंत देशातील कला, समाजसेवा, विज्ञान, अभियांत्रिकी, व्यवसाय, उद्योग, वैद्यक, साहित्य, शिक्षण, क्रीडा आणि नागरी सेवा अशा विविध क्षेत्रातील ५१८५ प्रतिभावान व्यक्तींना या पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. त्यामध्ये ५३ भारतरत्न, ३४३ पद्मविभूषण, १३४१ पद्मभूषण आणि ३४४८ पद्मश्री मिळालेल्या व्यक्तीचा समवेत आहे. मानवतेसाठी आणि शांततेसाठी केलेल्या कार्याबद्दल पाकिस्तानचे खान अब्दुल गफ्फार खान (१९८७) आणि दक्षिण आफ्रिकेचे नेल्सन मंडेला (१९९०) या दोन परदेशी व्यक्तींनाही भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.



**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

**। दिनविशेष**

# खगोलशास्त्रज्ञ डॉ. विक्रम साराभाई

डॉ. विक्रम अंबालाल साराभाई हे भारतीय भौतिकशास्त्रज्ञ व खगोलशास्त्रज्ञ होते. ते भारताच्या अंतराळ संशोधनाचे पितामह आणि भारताच्या अंतराळ युगाचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. विक्रम अंबालाल साराभाई यांचा जन्म १२ ऑगस्ट १९१९ रोजी अहमदाबाद येथील एका संपन्न कुटुंबात झाला. त्यांचे वडील उद्योगपती होते. त्यांचे बऱ्याच राजकीय व्यक्तिंशी संबंध असल्याने रवींद्रनाथ टागोर, जवाहरलाल नेहरू, सरोजिनी नायडू, महात्मा गांधी आदी लोकांचे त्यांच्या घरी जाणे-येणे होते. विक्रम साराभाई यांच्या आई सरलादेवी यांनी



आपल्या ८ मुलाच्या शिक्षणासाठी स्वतःची मांटेसरी पद्धतीची शाळा काढली होती. या शाळेतच विक्रम साराभाई यांचे शिक्षण युरोपातून आलेल्या शिक्षकांद्वारे झाले. त्यांना लहानपणापासूनच गणित आणि भौतिकशास्त्र हे विषय विशेष आवडत होते.

आपले १२ वीपर्यंतचे शिक्षण आटोपून १९३७ साली पुढील शिक्षणासाठी ते ब्रिटनमधील केंब्रिज विद्यापीठात शिकायला गेले. पण दुसरे महायुद्ध सुरू झाल्याने ते भारतात परत आले व त्यांनी बंगलोरमधील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये नोबेल पारितोषिक विजेते सर सी. व्ही. रामन यांच्या मार्गदर्शनाखाली वैश्विक किरणावर संशोधन केले. १९४२ साली त्यांनी भरतनाट्यम, कुचिपुडी या नृत्यकलेत पारंगत असलेल्या प्रसिद्ध नृत्यांगना मृणालिनी साराभाई यांच्याशी विवाह केला. त्यांना कार्तिकेय आणि मल्लिका ही दोन अपत्ये झाली. १९४५ साली दुसरे महायुद्ध संपल्यावर विक्रम साराभाई ब्रिटनला गेले.

१९४७ साली त्यांनी क्कॉस्मिक रे इन्व्हेस्टिगेशन इन ट्रॉपिकल लॅटीट्यूड्सफ वर संशोधन करून डॉक्टरेट मिळवली आणि त्याचवर्षी ते आपल्या मायदेशी परत आले. भारतात परत येउन त्यांनी नोव्हेंबर ११ १९४७ ला अहमदाबाद येथे भौतिकी संशोधन कार्यशाळेची स्थापना केली. हे त्यांचे पहिले पाउल होते, पुढे जाऊन अवकाश संशोधनात विक्रम साराभाई यांनी भरीव कामगिरी केली. विक्रम साराभाई यांनी अहमदाबाद येथील भारतीय प्रबंध संस्था (इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेन्ट) स्थापन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. १९७५ मध्ये जो पहिला अंतरिक्ष उपग्रह आर्यभट्ट अवकाशात सोडला गेला त्याची रचना विक्रम साराभाई यांच्या अहमदाबाद रिसर्च सेंटर मध्येच केली होती. आर्यभट्टच्या यशस्वी प्रक्षेपणानंतर भारताने अनेक उपग्रह अवकाशात प्रक्षेपित केले. या यशामागे साराभाई यांचे अथक परिश्रम, दूरदृष्टी आणि खंबीर नेतृत्व ह्यांचा मोलाचा वाटा आहे.

विक्रम साराभाई यांनी जागतिक कीर्ती असलेल्या अनेक सस्थांची सुरूवात केली. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेन्ट ही भारतातील सर्वोत्कृष्ट व्यवस्थापन शिक्षण संस्था डॉ. साराभाई यांच्या प्रयत्नातूनच उभी राहिली. भौतिकशास्त्रातील संशोधनासाठी प्रसिद्ध असलेली राष्ट्रीय भौतिकी प्रयोगशाळा देखील डॉ. साराभाई यांनीच सुरू केली.

अहमदाबाद येथे वस्त्रोद्योग निर्मितीस चालना देणारे अहमदाबाद टेक्स्टाईल इंडस्ट्रीयल रिसर्च असोसिएशन या संस्थेची उभारणी त्यांनी केली. पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असलेली सेंटर फॉर इन्व्हीरॉन्मेंटल प्लॅनिंग अॅन्ड टेक्नॉलॉजी () ही संस्थादेखील त्यांनी उभारली. अशा या महान अंतराळ युगाच्या शिल्पकाराचे ३० डिसेंबर १९७१ रोजी निधन झाले.

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३० डिसेंबर

१) श्री.विश्वनाथ दादू राणे
मु.आवास, अलिबाग
३०-१२-१९४४


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)** ९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**


# वालाचे गणित बिघडले

**● गावठी शेंगांची पारख असलेल्या ग्राहकांचा हिरमोड ● शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान**

**| पालघर| प्रतिनिधी |**

अवकाळी पावसाने प्रथमतः खरीप हंगामातील भातशेतीतून तोंडाशी आलेला घास शेतकऱ्यांकडून हिरावून घेतला. त्यानंतर रब्बी हंगामात भाजीपाला लागवड आणि कडधान्याची नासाडी केली आहे. त्यातच आता ऐन गुलाबी थंडीत वातावरणीय बदलाचा फटका तूर, वालाच्या शेंगा उत्पादक शेतकऱ्यांनाही बसल्याचे चित्र ठाणे-पालघर जिल्ह्यातून समोर येत आहे. कारण आतापर्यंत वालाच्या शेंगांचे उत्पादनच झालेले नाही. तर तूर शेंगाचे उत्पादनही मुबलक प्रमाणात झाल्याचे शेतातून स्पष्ट होत आहे. त्यामुळे शेंगा प्रेमींना ग्रामीण भागातील गावठी शेंगांसाठी वाट पहावी लागणार आहे. तत्पूर्वी तूर, वालाच्या शेंगांची आवक मार्गशिष महिन्यापासून चांगल्या प्रमाणात होत होती. मात्र मागील एक दोन वर्षांपासून अवकाळी पाऊस अधून मधून हजेरी लावत असल्याने वालाच्या शेंगांचे उत्पादन लांबणीवर जात असल्याचे पाहायला मिळत आहे. दरम्यान सद्यस्थितीत ठाणे-पालघर मधील भाजीपाला बाजारातील उपलब्ध असलेल्या वालाच्या शेंगा ह्या अधिकतम नाशिक जिल्ह्यातून येत असल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. त्यामुळे ऐन थंडीत शेंगा प्रेमींच्या जिभेला हव्या असणाऱ्या ग्रामीणमधील गावठी शेंगांच्या चवीचा आस्वाद घेता येत नसून गावठी शेंगांची पारख असलेले ग्राहकांची हिरमोड होत असून असे ग्राहक नाशिक जिल्ह्यातील शेंगा खरेदी करण्यास कानाडोळा करत असून गावठी शेंगांच्या प्रतिक्षेत असल्याचे दिसून येत आहे.



दरम्यान मिळालेल्या माहितीनुसार, पूर्वीपासून खरीप हंगामातील भात शेतीच्या लावणीच्या वेळेला शेत बांधावरील शेतात तूर, वालाच्या शेंगांच्या बियाणांची लागवड केली जात होती. त्या शेंगांचे उत्पादन मार्गशिष महिन्याच्या प्रारंभी होऊन बाजारात अशा गावठी शेंगांची आवक मोठ्या प्रमाणात होत होती. तर त्यानंतर भात कापणीनंतर लागवड केलेल्या वालाच्या शेंगांचे उत्पादन जानेवारी, फेब्रुवारीपर्यंत मोठ्या प्रमाणात होत होते. परंतु मागील काही वर्षांपासून अवकाळीने भातशेतीसह भाजीपाला, कडधान्याचा अक्षरशः चुराडा केला असतानाच आता भातशेतीतील लावणी आणि कापणीचा कालावधी लांबल्याने तूर, वालाच्या शेंगांची लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांचेही गणित कोलमडले असून शेंगांच्या उत्पादनाची प्रतीक्षा करावी लागत असल्याने शेतकऱ्यांना नुकसान सहन करावा लागत आहे.

विशेष म्हणजे खरीपातील वाल व तूर पिकांच्या वाढीवरही या हवामान बदलाचा प्रतिकूल परिणाम झाला आहे. शेतकऱ्यांना मार्गदर्शन आवश्यक दीर्घकाळ ओलावा व सूर्यप्रकाशाचा अभाव यामुळे या पिकांत फुलोरा येण्यास विलंब झाला आहे.

### दुसऱ्या जिल्ह्यातील आवक वाढली

चालू खरीप हंगामात पावसाचा कालावधी वाढल्यामुळे जमिनीत ओलावा जास्त काळ राहिला. भात कापणी उशिरा झाली. त्यामुळे रब्बी हंगामातील कडधान्य पेरणी उशिरा झाली. तसेच खरीपमधील लागवड असलेली वाल, तूर पिकाच्या वाढीवर सुद्धा त्याचा परिणाम झाला असून फुलोऱ्यावर येण्याचा कालावधी वाढला. परिणामी दुसऱ्या जिल्ह्यातील आवक वाढली आहे. तसेच यावेळी ठाणे पालघर जिल्ह्यातील भातपिक शेतकऱ्यां प्रमाणेच तूर, वाल उत्पादनातील शेतकऱ्यांनाही वातावरणीय बदलामुळे मोठ्या प्रमाणात नुकसानीला सामोरे जावे लागणार आहे.

## तालुक्यात रस्त्यांचे जाळे पसरले

**| तळा | प्रतिनिधी |**

तळा तालुका हा दुर्गम डोंगराळ असून तालुक्यात गावागावापर्यंत पोहचलेले रस्ते हे दळणवळणासाठी आधार ठरत आहेत. रस्ते हे मानवी जीवनाचा अविभाज्य घटक बनत असून जे लोकांना जलदगतीने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सुरक्षितपणे पोहचण्यास मदत करत असतात. यामधे प्राचीन काळातील पायवाटा व आताच्या आधुनिक काळातील महामार्ग व इतर रस्ते यामुळे तळा तालुक्यातील दळणवळण सुविधा चांगल्या झाल्या आहेत. याचा फायदा विविध वहानांसाठी, मालवाहतुकीसाठी, सामाजिक आर्थिक विकासाच्या दृष्टीने यांचा उपयोग होत असतो. तालुक्यात रस्त्यांचे जाळे पसरले असून प्रत्येक गाव तळा-इंदापूर, तळा-मांदाड- रोवळा-मजगाव-म्हसळा व तळा-तळेगाव-उसर या मुख्य रस्त्यांना जोडल्याने गावागावांतील नागरिकांना प्रवास करताना, व उद्योगधंदे, व्यवसाय, नोकरी साठी सहजगत्या माणगाव, रोहा व मुंबई, पुणे सारख्या शहरांकडे जाता येत आहे.

## नरेंद्र नागावकर यांचे निधन

**| वाघ्रण | प्रतिनिधी |**



अलिबाग तालुक्यातील कामार्ले गावचे तरुण नरेंद्र मुकुंद नागावकर यांचे अल्पशा आजाराने बुधवार (दि.२४) रोजी अल्पशा आजाराने जे. जे रुणालय मुंबई येथे निधन झाले. ते ५६ वर्षंचे होते. त्यांच्यावर गुरुवार (दि.२५) डिसेंबर रोजी कामार्ले स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे दिवस कार्य शुक्रवार (दि.२) डिसेंबर रोजी दशक्रिया तर रविवार (दि.४) तारखेला बारावे होणार आहे. त्यांच्या मागे पत्नी दोन मुलगे स्नुशा असा परिवार आहे.

## ई-आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

रयत शिक्षण संस्थेचे, महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पनवेलमधील अर्थशास्त्र विभाग आणि आयक्युएसी यांच्या संयुक्त विद्यमाने ट्रान्सफॉर्मिंग इंडियन एग्रीकल्चर टू वर्ड्स आत्मनिर्भर भारत टेक्नॉलॉजी इनोव्हेशन ॲण्ड आर्टिफिशियल इंटेलिजन्स या विषयावर आधारित एकदिवशीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या ई-चर्चासत्रासाठी बीजभाषक म्हणून डॉ. बद्री नारायणन गोपाळकृष्णनन व मार्गदर्शक म्हणून सुनील मदन तसेच संशोधन पेपर सादरीकरण सत्राचे प्रमुख म्हणून प्रोफेसर डॉ. सुरेश मैंद यांना निमंत्रित केले होते. या चर्चासत्राचे बीजभाषक डॉ. बद्री नारायणन यांनी आपल्या बीज भाषणामध्ये आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी भारतामध्ये कृषी क्षेत्रामध्ये एआय तसेच तंत्रज्ञानाच्या वापरासह अमुलाग्र बदलाची गरज आहे सांगितले. तर प्रमुख मार्गदर्शक सुनील मदन यांनी जागतिक स्पर्धे ला तोंड देण्यासाठी भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये कृषी क्षेत्रामध्ये नाविन्य सह बदल होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. प्रोफेसर डॉ. सुरेश मैंद यांनी देखील आत्मनिर्भर भारताचे स्वप्न पूर्ण करण्यामध्ये भारतातील कृषी क्षेत्र नक्कीच महत्त्वाची भूमिका यापुढे बजावेल असा विश्वास व्यक्त केला.

## शेलू स्वयंभू भवानी देवीचा यात्रा सुरु

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत तालुक्यातील शेलू गावची ग्रामदैवत आई भवानी मातेचा उत्सव साजरा होत आहे. पौष महिन्यात सात दिवसांची यात्रा सुरु झाली आहे. या परिसरातील लोकांसाठी हा उत्सव मनोरंजनाचा ठरत आहे. नेरळ परिसर तसेच वांगणी परिसरातून हजारो लोक या यात्रा उत्सवात सहभागी होत असतात. शेलू गावाच्या पश्चिमेला असलेल्या माळरानावर आई भवानी मातेचे लहानसे मंदिर आहे. गावाच्या चारही दिशेला अशी मंदिरे असून त्यापैकी कल्याण-कर्जत रस्त्याच्या पलीकडील भागात भवानी मातेचे मंदिर आहे. एका जांभळाच्या झाडाखाली आई भवानी माता विसावली असून हे झाड शतकाहून अधिक जुने असल्याचे जाणकार सांगतात. गावातील प्रत्येक घरी काही शुभकार्य असेल तर ग्रामस्थ देवीचा मान देण्यासाठी तेथे आवर्जून जातात.



देवीची ओटी भरणे, पूजाअर्चा करणे तसेच नित्य पूजा शेलू ग्रामस्थांकडून केली जाते. या ठिकाणी नवरात्र उत्सव काळात देवीला माळ लावणे आदींसह गरबा तसेच लहान मुलांचे खेळ आयोजित केले जातात. या भागातील असंख्य भाविकांची या देवीवर श्रद्धा आहे. त्यामुळे प्रत्येक शुभ कार्याला भाविक येथे आवर्जून हजेरी लावत देवीची मनोभावे पूजा करतात. दरवर्षी पौष महिन्यात ही यात्रा भरवली जाते. मनोरंजनाचे अनेक खेळ उपलब्ध करण्यात आले आहेत. शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात आले आहे.

## माथेरान नगरपरिषदेच्या शाळेचे बदलले रुपडे

**| माथेरान | प्रतिनिधी |**

शहराच्या मध्यवर्ती भागात असणाऱ्या वीर हुतात्मा भाई कोतवाल नगरपरिषदेच्या शाळेचे रुपडे पालटताना दिसत असून याकामी मुख्याधिकारी राहुल इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली कॅरिंग फ्रेंड्स संस्था मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने येथील वीर हुतात्मा भाई कोतवाल नगरपरिषदेच्या शाळेची डागडुजी त्याचप्रमाणे रंगरंगोटी, परिसराची स्वच्छता, विद्यार्थ्यांना खेळण्यासाठी मैदान, उत्तम प्रकारे शौचालय व्यवस्था, परिसरातील जागेत वाचनालयाचे काम लवकरच सुरू करण्यात येणार असून सद्यस्थितीत या



शाळेचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलला आहे. मुख्याध्यापक दिलीप अहिरे, संतोष चाटसे यांसह अन्य शिक्षक वृंद यासाठी मेहनत घेत असून कॅरिंग फ्रेंड्स संस्था मुंबई यांच्या वतीने शाळेच्या छपरावर नुकताच सहा सोलर लावण्यात आले आहेत. इंग्रजी भाषा यायला हवी यासाठी बहुतांश पालकवर्ग मुलांना इंग्रजी शाळेत भरती करत असतात.नगरपरिषदेच्या या शाळेत उत्तम प्रकारे शिक्षण मिळत असून अनेक विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रात आपल्या कलागुणांना वाव दिलेला आहे.

## नाल्यात वाढलेल्या गवतामुळे सापांची भीती

**| खारघर | प्रतिनिधी |**

खारघर सेक्टर ४० येथील सिडकोच्या बागेश्री गृहनिर्माण सोसायटी लगत असलेल्या नाल्यात मोठ्या प्रमाणात वाढलेल्या गवतामुळे परिसरात विषारी सापांचा वावर वाढला आहे. त्यामुळे परिसरातील रहिवाशांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, पालिकेने तातडीने नाल्याची साफसफाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. रोहिंजन डोंगरातून पावसाळ्यातील पाणी या नाल्यातून तळोजा खाडीकडे जाते, मात्र गेल्या काही महिन्यांपासून नाल्यात गवत व कचरा वाढल्याने तेथे साप, उंदीर, आणि इतर सरपटणारे प्राणी वावरू लागले आहेत. या नाल्यालगतची बागेश्री सोसायटी मोठी असून, १,७८८ सदनिका आणि सुमारे पाच हजार रहिवासी येथे वास्तव्यास आहेत. अलीकडेच सोसायटीच्या आवारात विषारी साप दिसल्याची घटना घडली. त्यामुळे महिला व मुलांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

## भाजलेल्या रुग्णांवर उपचार सुलभ

**| मुंबई | प्रतिनिधी |**

परळ येथील केईएम रुणालयात नूतनीकरण करण्यात आलेल्या जळीत रुग्ण उपचार केंद्राचे (बर्न केअर सेंटर) लोकार्पण शैलेश लिमडी यांच्या हस्ते करण्यात आले. या केंद्रामध्ये जळीत रुग्णांसाठी अद्ययावत वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, महिला व बालकांसह आता पुरुष रुग्णांनाही उपचाराची सुविधा देण्यात येणार आहे. या केंद्रामार्फत वर्षाला सुमारे १५० ते १७० जळीत रुग्णांवर उपचार करणे शक्य होणार आहे. लोकार्पण सोहळ्यास केईएम रुग्णालयाच्या अधिष्ठाता डॉ. संगीता रावत, प्लॅस्टिक सर्जरी विभागाच्या प्रमुख डॉ. विनिता पुरी, रुग्णालयातील विविध विभागांचे प्रमुख व मान्यवर उपस्थित होते.भाजलेल्या व जळीत रुग्णांना तातडीने व योग्य वेळी उपचार मिळावेत, यासाठी अद्ययावत सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी दिले होते. तसेच अशा रुग्णांना संसर्गाचा धोका टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना अतिरिक्त महापालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) यांनी दिल्या होत्या. विविध शासकीय योजनांच्या माध्यमातून गरजू रुग्णांना दर्जेदार वैद्यकीय सेवा देणे हे या केंद्राचे प्रमुख उद्दिष्ट असल्याची माहिती उपायुक्त (सार्वजनिक आरोग्य) शरद उघडे यांनी दिली. रुग्णांच्या



सोयीसाठी कक्षामध्ये आधुनिक फर्निचर, योग्य प्रकाश व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे.

उपचारादरम्यान होणाऱ्या वेदनांपासून लक्ष विचलित व्हावे, या उद्देशाने कक्षामध्ये दूरदर्शन संचही बसविण्यात आले आहेत. तसेच तातडीच्या उपचारांसाठी सुसंगत रचनेचा स्वतंत्र उपचार कक्ष निर्माण करण्यात आला आहे. तसेच प्रशिक्षित वैद्यकीय पथक सदैव कार्यरत राहणार आहे.

**ट्रेकसाठी ऑनलाइन बुकिंग अनिवार्य** | **संवर्धनाचा समतोल साधण्याची गरज**

# अंधारबन : सह्याद्रीच्या कुशीतलं जंगल

**| सुधागड-पाली | प्रतिनिधी |**

पुणे आणि रायगड जिल्ह्यांच्या सीमेवर वसलेलं 'अंधारबन' हे सह्याद्री पर्वतरांगांतील एक अनोखं आणि निसर्गरम्य जंगल आजकाल पर्यटकांच्या विशेष आकर्षणाचे ठिकाण बनले आहे. दाट झाडी, पायथ्याशी वाहणारे ओढे, सतत धुक्याने वेढलेलं वातावरण आणि जैवविविधतेने समृद्ध असा हा परिसर 'निसर्गाच्या शांततेचं स्वर्ग' म्हणून ओळखला जातो.

मुळशी तालुक्यातील पिंपरी गावातून सुरू होणारा अंधारबन ट्रेक सुमारे १३ ते १५ किलोमीटर लांबीचा असून, रायगड



जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील भिरा धरणाजवळ संपतो. हा ट्रेक उतारावरून चालणारा असून, सोपा ते मध्यम स्वरूपाचा मानला जातो. पावसाळ्यात या मार्गावरून जाताना धबधबे, ओढे, ढग आणि हिरवाई यांचा सुरेख समन्वय अनुभवता येतो. मात्र या काळात मार्ग अत्यंत घसरडा असल्याने अनुभवी मार्गदर्शकासहच ट्रेक करणं सुरक्षित ठरते.

जंगलात मोर, धनेश, बुलबुल, सूर्यपक्षी यांसारख्या पक्ष्यांच्या दुर्मिळ प्रजाती आढळतात. तसेच विविध प्रकारचे साप, सरडे, फुलपाखरं आणि औषधी वनस्पतींचंही घनदाट अस्तित्व येथे आहे. संवर्धनासाठी वनविभाग आणि स्थानिक स्वयंसेवी संस्थांच्या संयुक्त विद्यमाने 'अंधारबन स्वच्छता अभियान' तसेच विद्यार्थ्यांसाठी निसर्ग शिक्षण शिबिरे आयोजित केली जात आहेत. अंधारबनचा पर्यटन विकास होत असला तरी निसर्गाची शांतता आणि जैविक समतोल अबाधित ठेवण्याचे आव्हान कायम आहे.

ट्रेकसाठी ऑनलाइन बुकिंग अनिवार्य असून, पिंपरी गावात वाहन उभी करून पुढे एक किलोमीटर पायी चालत चौकीवर बुकिंग दाखवावे लागते. प्रत्येक वीस जणांच्या गटास एक अधिकृत मार्गदर्शक दिला जातो. प्लास्टिक वस्तू नेण्यास सक्त मनाई असून, पाण्याच्या बाटलीसाठी पन्नास रुपयांचे डिपॉझिट घेतले जाते, जे परतीच्या वेळी बाटली परत दिल्यावर मिळते. मद्यपान किंवा मद्य नेण्यास पूर्णतः बंदी आहे.

**अंधारबन हे केवळ ट्रेकिंग पॉइंट नसून निसर्गाच्या कुशीतले जिवंत संग्रहालय आहे. याची जपवणूक आणि संवर्धन ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. पर्यटन आणि पर्यावरण यांच्यातील समतोल राखत अंधारबनचं हिरवं, धुक्यातलं वैभव कायम ठेवणे हेच आजचे खरे आव्हान आहे.**

## निवडक

### लोअर तुडीलतर्फे दिनदर्शिकेचे प्रकाशन



**महाड :** महाड तालुक्यातील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ संलग्न आशीर्वाद क्रिडा मंडळ लोअर तुडील यांच्या वतीने दिनदर्शिका सन २०२६ चे वाघे हॉल परळ येथे प्रकाशन करण्यात आले. सदर दिनदर्शिकेचे प्रकाशन इक्बाल चांदले, कुणबी समाजोन्नती संघ महाड पोलादपूर शाखाध्यक्ष सत्यवान यादव, संघ सरचिटणीस कृष्णा वने, उपाध्यक्ष शंकरराव म्हस्के, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष बबन सकपाळ आदी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सेक्रेटरी राजाराम तांबे, उपाध्यक्ष गणेश गोठल, उपाध्यक्ष सचिन तांबे, विनोद मांडवकर, हिशोब तपासणी रोहिदास गोठल,गितेश रसाळ, संचालक सत्यवान जाधव, सल्लागार मनोहर पवार, सल्लाागार विजय रेशीम, महिला पदाधिकारी कल्याणी गोठल, रिया तांबे आदी उपस्थित होते.



### कुणबी समाजातर्फे सत्कार

**माणगाव :** माणगाव तालुका कुणबी समाज साले ग्रुप यांच्या विद्यमाने आयोजित तालुका विकास मंडळ व साले ग्रुपची नूतन कार्यकारणी तसेच माणगाव नगरपंचायतीच्या नवनिर्वाचित उपनगराध्यक्षा रिया उभारे यांचा सत्कार समारंभ तालुका कुणबी समाज विकास मंडळाचे अध्यक्ष महादेवराव बक्कम यांच्या प्रमुख उपस्थितीत व साले ग्रुपचे नवनिर्वाचित अध्यक्ष सुभाष गुगले यांच्या अध्यक्षतेखाली रविवार (दि.२८) डिसेंबर रोजी संपन्न झाला. या कार्यक्रमास मंडळाचे तालुका उपाध्यक्ष शैलेश भोनकर, रामभाऊ टेंबे, गंगाराम उभारे, संगीता बक्कम, रत्नाकर उभारे, सहदेव बक्कम, सुरेश वाढवळ, भागोजी डवले, काशीराम पाखुर्डे, सखाराम खरंगटे, सुधाकर पालकर, चंद्रकांत उभारे, दिलीप जाधव, राजू शेडगे, प्रा.भारत पवार, कृष्णा पानवकर, रवींद्र अर्बन आदींसह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या समारंभाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन साले ग्रुपचे सदस्य कृष्णा पानवकर यांनी केले.

### अवैध पार्किंगमुळे वाहतुककोंडी

**नागोठणे :** महामार्गावरील तसेच वाकण-पाली-खोपोली मार्गाकडे येण्या-जाण्यासाठी महत्वाचा नाका म्हणून वाकण नाक्याची ओळख आहे. वाकण नाक्यावर अनेक हॉटेल्स आहेत. त्यामुळे मुंबई-गोवा महामार्गावरून तसेच वाकण-पाली-खोपोलीकडे येणाऱ्या-जाणाऱ्या गाड्या चहा-नाष्टा करण्यासाठी नाक्यावरील हॉटेलच्या समोर बिनधास्तपणे उभ्या करतात. परिणामी त्याचा त्रास स्थानिक वाहनचालकांसह पादचाऱ्यांना होत आहे.या मार्गावरील वाहनांची संख्या पाहता वाकण नाका हा वाहतुकीच्या दृष्टीने पार्कीगसाठी अपुरा ठरत आहे.त्याच्यातच या नाक्यावरुन मोठ्या प्रमाणात प्रमाणापेक्षा जास्त भरलेल्या डंपरमधुन कोळशाची देखील वाहतुक होत आहे. दरम्यान रस्त्याच्या दोन्ही बाजुला हॉटेल्स असल्यामुळे या ठिकाणी थांबणाऱ्या वाहनांमुळे वाहतुक कोंडीची समस्या निर्माण होत असून अनेक वेळा अपघात सुद्धा घडत आहेत. अनेकदा तर वाहनचालकांमध्ये शुल्लक कारणांवरुन वाद होतात. वाहतुकोंडीवरती नियंत्रण करण्यासाठीवाकण नाक्यावर पोलिस चौकी कार्यरत आहे. परंतु पोलीस असुनही वाहतुक नियमांचे उल्लंघन करीत वाहने रस्त्याच्या दुतर्फा लावलेली पहावयास मिळत आहेत.

### माजी विद्यार्थ्यांच्या आठवणींचा सोहळा

**खरोशी :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत माझी शाळा माझा अभिमान उपक्रम अंतर्गत पेण तालुक्यातील राजिप शाळा कणे येथे शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा चंद्रकांत म्हात्रे-माजी मुख्याध्यापक यांच्या उपस्थितीत पार पडला. कार्यक्रमासाठी सुगिता पाटील, देविदास पाटील, बाळाराम पाटील, हेमलता पाटील, राजेंद्र म्हात्रे, जनार्दन म्हात्रे, राजाराम म्हात्रे, संभाजी पाटील, भास्कर पाटील, धिरज पाटील, जयवंत बांधणकर, शामकांत पाटील, नंदा म्हात्रे, रामदास पाटील, कुणाल पाटील, निकिता म्हात्रे, विद्या पाटील, विजय पाटील, निता भोईर, अजित पाटील, नितेश पाटील, शरद पाटील, नंदिनी पाटील, ज्योती पाटील,आदी मान्यवरांच्या उपस्थितीत आनंद सोहळा साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन आदिनाथ पाटील यांनी केले. सोहळा यशस्वी करण्यासाठी आश्लेषा पाटील, चेतना विनायक मोकल, रेणुका दस्तुरे व सर्व सहकारी शिक्षक यांनी मेहनत घेतली.




### शिव आदिवासी शाळेत चप्पलचे वाटप



**तळा :** तळा तालुक्यातील राजिपच्या शिव आदिवासी वाडी शाळेतील विद्यार्थ्यांना चप्पल वाटप करण्यात आले. हरी ओम चॅरिटेबल ट्रस्ट सायन कोळीवाडा मुबई संस्थेचे अध्यक्ष विजय नागरथ यांच्या आर्थिक सहकार्यातून व सामाजिक कार्यकर्ते कृष्णा महाडिक यांच्या प्रयत्नातून तळा तालुक्यातील शिव आदिवासी वाडी शाळा रोवला या शाळेतील विद्यार्थ्यांना चप्पल वाटप करण्यात आले.आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने ग्रामीण भागातील आदिवासी विद्यार्थ्यांना चप्पल न घालताच उन्हातान्हातून पायी चालत शाळेत जावे लागते.या विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी कोणतीही अडचण येऊ नये यासाठी कृष्णा महाडिक यांच्या प्रयत्नातून आत्तापर्यंत तळा व म्हसळा तालुक्यातील एकूण ४५० विद्यार्थ्यांना चप्पल वाटप करण्यात आले आहेत. यावेळी संदीप कांबळेकर यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना चप्पलचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक आडसरे, शिक्षिका कुसारे, गणेश पवार, सर्व सदस्य व पालक उपस्थित होते.

## निवडक



### दांडेकरांचा कर्मचाऱ्यांकडून सन्मान

**आगरदांडा** : मुरूड शहराच्या अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा आराधना दांडेकरांचा सोमवार (दि.२९) डिसेंबर रोजी मुरूड जंजिरा नगरपरिषद कार्यालयातील नगराध्यक्षा दालनात नगरपरिषदेचे कर्मचारी संघटनेकडून पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष-मंगेश दांडेकर, मुग्धा दांडेकर, नगरपरिषद कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष प्रकाश आरेकर, नगरपरिषद कर्मचारी रायगड जिल्हा अध्यक्ष राकेश पाटील, उपाध्यक्ष राजु पाटील, प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आंबेतकर, कर निरीक्षक अनिकेत जगदाळे, रचना अभियंता अनिकेत जगदाळे, सतेज निमकर, संजय बामगुडे, मुकादम अभिजित चांदोरकर, दिप्ती एरंडे, पल्लवी डोंगरीकर, नम्रता करडे, प्रणाली करडे, जयकृष्ण भिसे, सचिन कोरके, प्रशांत दिवेकर, अक्षता तुळसकर, पल्लवी पडवळ, स्वप्नजा विरकुड, स्मिता मुरूडकर आदिंसह कर्मचारी संघटनेचे कर्मचारी दिसत आहेत.

### हर्ष चोगलेची भारतीय सैन्यात निवड

**माणगाव** : देशसेवेचे स्वप्न उराशी बाळगून कठोर परिश्रम, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या बळावर यश संपादन करणाऱ्या माणगाव शहरातील खांदाड गावातील सुपुत्र हर्ष गणेश चोगले याची भारतीय सैन्यात नुकतीच निवड झाली आहे. या अभिमानास्पद यशाबद्दल खांदाड गावातील ग्रामस्थांनी सोनभैरव मंदिरात एकत्र येत हर्ष चोगले याचा अत्यंत भावस्पर्शी सत्कार केला. सत्कार समारंभावेळी माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पोवार, काशिराम पोवार, कल्पना दिवेकर, कृष्णा दिवेकर, महेश पवार, मारुती मालोरे, रविंद्र पारखे, गायत्री चोगले, गणेश चोगले, तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.



### दिव्यांग बांधवांना निधीचे वाटप

**चिरनेर** : ग्रामपंचायत निधीच्या ५ टक्के अनुदानातून नवघर ग्रामपंचायतीतर्फे दिव्यांग बांधवांना निधीचे वाटप करण्यात आले. यावेळी सरपंच सविता मढवी, उपसरपंच प्रियदर्शनी म्हात्रे, ग्रामसेवक अविनाश पिंपलकर, माजी उपसरपंच विश्वास तांडेल, दिनेश बंडा, संध्या पाटील, आरती चौगुले, कुंदन कडू, अक्षरा जोशी, श्रीमती उषा बंडा, नयना बंडा, रंजना भोईर, कविता पाटील, रत्नाकर चौगुले, नम्रता पाटील, प्राची पाटील, जयमला पाटील यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते अविनाश म्हात्रे, नितिन मढवी, आतिश भोईर, कुंदन बंडा, महावीर पाटील, अरुण पाटील व कर्मचारी उपस्थित होते.

### कळंबोली वसाहतीतील महिला बेपत्ता

**पनवेल** : कळंबोली वसाहतीमध्ये राहणारी रश्मी भागेश जाधव (२९) ही महिला बँकेच्या कामासाठी सिवुड्स येथे जाते असे सांगून घराबाहेर पडली. मात्र, ती अद्याप घरी न परतल्याने ती हरवल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. रश्मी भगतची उंची ५ फुट २ इंच, चेहरा-गोल, नाक सरळ, डोळेबारीक, डोक्याचे केर साधारण वाढलेले, बांधा जाड, अंगावर नेसुस रंगाचे कपडे घातले असून तिला मराठी व हिंदी भाषा बोलता येते. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी कळंबोली पोलीस ठाणे किंवा पोलीस हवालदार एस. व्ही. मासुळ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.





### ज्येष्ठ नागरिकांना टोप्यांचे वाटप

**वाघ्रण** : अलिबाग तालुक्यातील ज्येष्ठ नागरिक संघ वाघ्रण -खारपेढांबेच्या सभासदाना थंडीपासून संरक्षण होण्यासाठी उबदार उलन टोप्यांचे वाटप अध्यक्ष विनायक म्हात्रे यांच्या निवासस्थानी (दि.२०) डिसेंबर रोजी करण्यात आले. संघाचे ज्येष्ठ सभासद मोहन धोदरे यांचे पुत्र भूषण धोदरे यांनी स्वखर्चाने टोप्या वाटप करण्यात आले. यावेळी ६० जणांना टोप्या वाटप करण्यात आल्या. कार्यक्रमास दिपक पाटील, गणेश पाटील, प्रमोद पाटील, हरिश्चंद्र भोईर, बाळकृष्ण पाटील शिरीष पाटील, अभिमन्यू पाटील, विश्वनाथ पाटील यांच्या सह अनेक जण उपस्थित होते.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- कुरुळ ता. अलिबाग येथे दोन तीन गुंठे प्लॉट त्वरीत देणे आहे. ७७२०८४३९९९, ८०८७४७३९९९
- मंगल ग्रेन स्टोअर्स, बाजारपेठ अलिबागमध्ये कामासाठी मूले व मुली पाहिजेत संपर्क - ७८७५९९००९२
- अलिबागमध्ये एका ऑफिसमध्ये कार्यालयीन सहाय्यक पाहिजे. पगार ८०००/- ते १२,०००/- कार ड्राइव्हींग येत असल्यास उत्तम वयोमर्यादा. २५ ते ४५ संपर्क : ८००७८९७८६६
- अलिबागमधील सुपर मार्केटमध्ये कामासाठी मुली/स्त्रिया पाहिजेत. मो. ९३२२८२३४०४
- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधली अडचण फोन नं. ९९६०४५६९८६ अलिबाग

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# उरणचा तिसरा डोळा निकामी

- वीज जोडणी अभावी सीसीटीव्ही कॅमेरे बंद
- नागरिकांच्या सुरक्षा रामभरोसे
- मागील काही महिन्यांपासून गुन्ह्याचे प्रमाण वाढले

| चिरनेर | प्रतिनिधी |

उरण परिसरातील अनेक मोक्याच्या ठिकाणी बसविण्यात आलेले १०५ सीसीटीव्ही कॅमेऱ्यापैकी फक्त ३० कॅमेरेच सुरू आहेत. वीजेच्या जोडणी अभावी ७५ सीसीटीव्ही कॅमेरे अद्यापही मागील काही महिन्यांपासून बंद पडले आहेत. ऐन सणासुदीमध्येच जनतेच्या सुरक्षेसाठी आणि पोलिसांच्या विविध तपास कामांसाठी उपयुक्त ठरणारा तिसरा डोळाच निकामी ठरला आहे. बंद पडलेल्या सीसीटीव्हीमुळे मात्र उरणकरांची सुरक्षा रामभरोसे उरली आहे.



जेएनपीए अंतर्गत असलेली आंतरराष्ट्रीय स्तरावरील खासगी पाच बंदरे, त्यावर आधारित उभारण्यात आलेल्या शेकडो कंटेनर यार्ड, सीएफएल, कंपन्यांमुळे उरण परिसर औद्योगिकदृष्ट्या प्रगती पथावर आहे. येत्या दोन वर्षांत या बंदरातून एक कोटी कंटेनर मालाची चढउतार होणार आहे.

त्यामुळे उरण आता आंतरराष्ट्रीय बाजारपेठ म्हणून ओळखली जाऊ लागली आहे.त्यानंतर आता मुंबई आणि तालुक्याला जोडणाऱ्या अटल सेतू आणि रेल्वे प्रवासी वाहतूक सुरू झाल्यानंतर मुंबई -उरण अंतर तर अवघ्या ६० मिनिटांवर आले आहे.या वाढत्या औद्यौगिकीकरणामुळे लोकसंख्याही वाढतच चालली आहे. त्यामुळे गेल्या काही महिन्यांपासून गुन्हेगारीमध्ये देखील वाढ झाली आहे. यामध्ये हत्या आणि चोरीच्या गुन्ह्यांमध्येही वाढ झाली आहे.

गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलिसांना सीसीटीव्ही कॅमेरे उपयुक्त ठरतात. मात्र उरण परिसरात ठिकठिकाणी बसविण्यात आलेले सीसीटीव्ही कॅमेरे अनेक महिन्यांपासून निकामी अथवा बंद पडलेले आहेत. तर रेल्वे स्थानक परिसर आणि काही मोक्याच्या ठिकाणी अद्यापही सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले नसल्याचे निदर्शनास आले आहे. मागील काही महिन्यांपासून उरण परिसरात हत्या, चोऱ्या आणि इतर गुन्ह्याचे प्रमाण वाढीस लागले आहेत.

मात्र, पोलिसांसाठी महत्वाचा दुवा ठरणारा तिसरा डोळाच निकामी ठरल्याने उरणची सुरक्षा सध्या रामभरोसे उरली आहे. यामुळे पोलिसांनाही अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.यामुळे उरण परिसरातही सध्या भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.

मात्र, पोलिसांसाठी महत्वाचा दुवा ठरणारा तिसरा डोळाच निकामी ठरल्याने पोलिसांनाही अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. उरण परिसरातील अनेक मोक्याच्या व आवश्यक ठिकाणी १०५ सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत.त्यापैकी सध्याच्या घडीला फक्त ३० सीसीटीव्ही कॅमेरेच सुरू आहेत.

> वीजपुरवठ्या अभावी बसविण्यात आलेले ७५ सीसीटीव्ही कॅमेरे अद्यापही बंद आहेत. सीसीटीव्ही कॅमेरे सुरु करण्यासाठी येथील स्थानिक पातळीवर ओएनजीसी, गृहविभाग, उरण नगरपरिषद आणि संबंधित शासकीय विभागाकडे संपर्क साधण्यात आला आहे.
>
> -हनीफ मुलाणी
> उरण पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक



## राजेश टोपे यांची माथेरान दवाखान्यास भेट

| नेरळ | प्रतिनिधी |

राज्याचे माजी आरोग्य मंत्री राजेश टोपे यांनी व्यस्त वेळापत्रकातून थंड हवेचा आस्वाद घेण्यासाठी माथेरानला भेट दिली. टोपे यांनी माथेरान येथे आल्यावर सरकारी दवाखान्यात जाऊन माहिती घेतली. यावेळी माथेरान नगरपरिषदेच्या बी. जे रुग्णालयात येऊन अनेक उपकरणांची पाहणी केली. तसेच ऑपरेशन थिएटर, आणि अन्य कक्षांची पाहणी केली. त्यानंतर तेथील वैद्यकीय अधिकारी यांच्यासोबत चर्चा केली. याप्रसंगी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी राहुल इंगळे, वैद्यकीय अधिकारी डॉ. रुपाली मिसाळ उपस्थित होते.

## उलवेतील अनधिकृत होर्डिंग्ज पाडले

**पनवेल** : उलवेतील पुष्पक नगर परिसरात अटल सेतू लगत असलेल्या सिडको अधिसूचित व संपादित जागेवर अनधिकृतपणे उभारण्यात आलेले ६ अनधिकृत जाहिरात होर्डिंग पाडण्याची कारवाई सिडकोच्या अनधिकृत बांधकामे विभागाने केली आहे. या जाहिरात होर्डिंगने सिडकोचे अंदाजे ४६२ चौ. मीटर क्षेत्रफळ जागेवर अतिक्रमण केले होते. या जाहिरात होर्डिंग सिडकोच्या प्रचलित नियमावलीचा भंग करुन सिडकोची कोणतीही अधिकृत परवानगी न घेता उभारण्यात आले होते. त्यामुळे सिडकोचे सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार जाहिरात होर्डिंगवर निष्कासन कारवाई करण्यात आली.



दिवेआगर समुद्र किनाऱ्यावरील अप्रतिम सूर्यास्त पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहे. (छायाचित्र : अमेय नाझरे, बोर्ली पंचतन)

## म्हसळा-श्रीवर्धन पोलिसांची तारेवरची कसरत

| म्हसळा | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्यातील प्रसिद्ध पर्यटनस्थळे श्रीवर्धन, दिवेआगर आणि हरिहरेश्वर येथे पर्यटकांची मोठी गर्दी उसळली आहे. पुणे, मुंबई, सातारा, अहिल्यानगर, सांगली आदी विविध भागांतून हजारो पर्यटक खासगी वाहनांनी कोकणात दाखल झाले आहेत त्यामुळे या परिसरात वाहतुकीचा ताण लक्षणीयरीत्या वाढला आहे.

सुट्ट्यांच्या पार्श्वभूमीवर वाढलेल्या वाहनांच्या संख्येमुळे कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे आणि वाहतूक सुरळीत चालवणे हे मोठे आव्हान पोलीस प्रशासनासमोर उभे ठाकले आहे



या परिस्थितीत श्रीवर्धन व म्हसळा पोलीस प्रशासनाकडून अत्यंत काटेकोर नियोजन राबविण्यात येत असून पोलिसांची चांगलीच तारेवरची कसरत सुरू आहे. विशेषतः पर्यटकांची वाहने म्हसळा शहरात प्रवेश न करता थेट म्हसळा बायपास मार्गेच मार्गस्थ व्हावीत यासाठी म्हसळा पोलिसांकडून कठोर उपाययोजना करण्यात येत आहेत. स्थानिक नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास होऊ नये यासाठी बायपास रस्त्यावर पोलिसांचा सतत बंदोबस्त तैनात ठेवण्यात आला आहे. गर्दीच्या वेळेत वाहनांचे वळवणे, मार्गदर्शन करणे तसेच अनावश्यक शहरप्रवेश रोखणे यावर विशेष लक्ष दिले जात आहे. या संपूर्ण वाहतूक व्यवस्थेवर म्हसळा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रविंद्र पारखे हे स्वतः बारकाईने लक्ष ठेवून परिस्थितीनुसार तात्काळ उपाययोजना केल्या जात आहेत. पोलिसांच्या या सतर्कतेमुळे मोठ्या प्रमाणात वाहतूक असूनही परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यात यश येत आहे. दरम्यान पर्यटकांच्या वाढत्या वर्दळीचा सकारात्मक परिणाम स्थानिक अर्थव्यवस्थेवरही दिसून येत आहे. म्हसळा बायपास रस्त्यावरील छोटे-मोठे हॉटेल व्यावसायिक तसेच टपरीवाले व्यावसायिक सध्या प्रचंड व्यस्त झाले असून वर्षअखेरीचा हा पर्यटन हंगाम त्यांच्यासाठी आर्थिकदृष्ट्या दिलासादायक ठरत असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

## केणींनी दिले सापाला जीवदान



**उरण** : उरण तालुक्यातील कळंबुसरे येथील रहिवासी नंदकुमार तांडेल यांच्या घरामध्ये रविवारी (दि.२८) साप दिसून आला. तांडेल यांच्या परिवारात लहान मुले व महिला असल्यामुळे त्यांच्यात भितीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यांनी चिरनेर गावातील सर्पमित्र विवेक केणी यांना फोन केला. सर्पमित्र केणी यांनी प्रसंग सावधगिरी बाळगून सदर नाग जातीच्या सापाला पकडले. सर्पमित्र विवेक केणी यांनी सदर नाग जातीच्या सापाला सुरक्षित ठिकाणी सोडण्याचे काम केले आहे. केणी यांनी मागील काही वर्षांपासून जवळ जवळ अनेक जातींच्या सापांना जीवदान देण्याचे काम केले आहे.

## पुष्कराज सूर्यवंशींचा निरोप समारंभ

| माणगाव | प्रतिनिधी |

माणगावचे उपविभागीय पोलीस अधिकारी पुष्कराज सूर्यवंशी यांनी प्रदीर्घ सेवेनंतर सेवा निवृत्ती स्वीकारली. त्यांच्या निरोप समारंभावेळी संपूर्ण वातावरण भावनांनी ओथंबून गेले होते. पोलीस अधिकारी, कर्मचारी, व्यापारी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी तसेच सर्वसामान्य नागरिकांनी कृतज्ञता व्यक्त करत त्यांना सेवानिवृत्तीच्या निरोप दिला. या क्षणी अनेकांचे डोळे नकळत पाणावले. शांतता अबाधित ठेवण्यासाठी सूर्यवंशी यांनी नेहमीच अपार संयम, धैर्य आणि प्रामाणिकपणाने काम केले. त्यांच्या कार्यपद्धतीची दखल घेत वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी वेळोवेळी त्यांचे कौतुक करत अभिनंदन केले.



यावेळी विविध खात्यांचे अधिकारी, महसूल विभागाचे प्रतिनिधी, पोलीस पाटील, व्यापारी संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब दळवी, रिक्षा संघटनांचे पदाधिकारी, नातेवाईक, मित्रमंडळी तसेच पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. रविवार (दि.२८) डिसेंबर रोजी हॉटेल साईराम येथे पार पडलेला हा निरोप समारंभ केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता, एका कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याच्या सेवेला दिलेला हृदयस्पर्शी मानवंदना ठरला. पुष्कराज सूर्यवंशी यांच्या कार्याचा ठसा माणगावच्या इतिहासात कायमस्वरूपी कोरला गेला आहे.

## मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडी

| कोलाड | प्रतिनिधी |

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर सध्या वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. सुट्टी आणि आल्हाददायक थंडीचा लाभ घेण्यासाठी मुंबई, ठाणे, पुणे तसेच राज्यातील विविध भागांतून मोठ्या संख्येने पर्यटक कोकणात दाखल होत आहेत. मात्र, खांब-कोलाड परिसरात सुरू असलेल्या चौपदरीकरणाच्या अपूर्ण कामामुळे प्रवाशांना मोठ्या वाह-तूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. खांब व कोलाड परिसरात महामार्गाचे काम अद्याप पूर्ण न



झाल्याने येथे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या आहेत. एसटी बस, खासगी चारचाकी, रिक्षा, दुचाकी व इतर वाहनांमुळे महामार्गावर मोठ्या प्रमाणात गर्दी झाली असून वाहतूक विस्कळीत झाली आहे. त्यामुळे ही कोंडी नेमकी केव्हा सुटणार, असा सवाल प्रवाशांकडून उपस्थित केला जात आहे. दरम्यान, कोलाड येथे उड्डाणपुलाचे तसेच पुलालगत सर्व्हिस रोडचे काम सुरू आहे. खांब येथील पुलाच्या अपूर्ण अवस्थेमुळे वाहतुकीला अडथळे निर्माण होत आहेत.

सीमा शुल्क विभागाकडून कारवाई | बनावट कंपन्यांच्या नावाचाही वापर

# जप्त कंटेनर अनेक वर्षांपासून धूळखात

| चिरनेर | प्रतिनिधी |

सीमा शुल्क विभागाच्या विविध विभागाकडून संशयित किंवा तस्करीच्या कामासाठी वापरण्यात आलेले अथवा बनावट कागदपत्रांचा आधार घेऊन आयात-निर्यातीच्या प्रकरणात जप्त करण्यात आलेले शेकडो कंटेनर येथील विविध सीएफएस ठेवण्यात येतात. असे शेकडो संशयित कंटेनर अनेक वर्षांपासून जेएनपीटीच्या स्पीडी कंटेनर यार्डमध्ये धुळखात पडून असल्याचे सीएफएस कामगारांकडून सांगितले जात आहे.

जेएनपीए बंदरातील पाचही खासगी बंदरे आणि त्यावर



आधारित उरण परिसरात शेकडो सीएफएस, कंटेनर यार्ड, कंपन्या उभारण्यात आलेल्या आहेत. यामध्ये डीआरए, सीमा शुल्क विभागाच्या विविध विभागाकडून विविध प्रकारच्या तस्करीत वापरण्यात आलेले शेकडो कंटेनर जप्त केले जातात. उरण परिसरातील कोणत्याही कंटेनर यार्डमध्ये तस्करीसाठी वापरण्यात आलेले असे शेकडो कंटेनर मालासकट येथील जेएनपीएच्या विविध सीएफएमध्ये ठेवण्यात येतात. काही कंपन्या कंटेनरमधुन बनावट कागदपत्रांचा आधार घेऊन तस्करीच्या मालाची आयात-निर्यात करतात. अशा चोरट्या मालाची आयात-निर्यात करताना तस्करीत सहभागी असलेल्या कंपन्या आपले बिंग फुटले जाऊ नये यासाठी बनावट कंपन्यांच्या नावाचाही वापर करतात. तस्करीचा माल पकडला तर अशा बनावट कंपन्या माल ताब्यात घेण्यासाठी पुढे येत नाहीत. मग अशा आयात-निर्यातीच्या बेनामी तस्करी प्रकरणात जप्त करण्यात आलेले कंटेनर बेवारस म्हणुन घोषित केले जातात. अनेक वेळा तर आयात -निर्यात करण्यात येणाऱ्या मालात मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान सोसावे लागते. आयात करण्यात आलेला माल ने- आण करण्यात येण्यापूर्वीच खराब झालेला असतो.अशा प्रकारामुळे मोठ्या प्रमाणात झालेल्या आर्थिक नुकसानीमुळे मालक कंटेनर ताब्यात न घेता तसेच सोडून देतात. काही कंटेनर संशयित किंवा तस्करीच्या कामासाठी वापरण्यात आलेले असल्याने जप्त केले जातात. आयात-निर्यातीच्या प्रकरणात जप्त करण्यात आलेले शेकडो कंटेनर येथील सीएफएस ठेवण्यात येतात असे शेकडो संशयित कंटेनर अनेक वर्षांपासून जेएनपीएच्या विविध कंटेनर यार्डमध्ये धुळखात पडून आहेत.

### कंटेनरचे पुढे काय

सीमाशुल्क विभागाच्या ताब्यात असलेल्या अशा कंटेनरची संख्या सध्या वाढतच चालली असल्याचे येथील सीएफएसमध्ये कामगारांचे म्हणणे आहे. त्यामुळे अशा कंटेनरचे पुढे काय होते याची उत्सुकता नेहमीच कामगारांना लागुन राहिलेली असते.

अर्जदार तर्फे वकिल ॲड अतुल अ.चौगुले

**श्रीवर्धन येथील मा. दिवाणी न्यायाधिश (क. स्तर) सो., यांचे कोर्टात**

दिवाणी चौ. अर्ज नं. २५/२०२५
निशाणी क्र. ०८/ड
ने. ता. २८/०१/२०२६

**जाहीर नोटीस**

१) श्रीम.मृगल गौरव काळबेरे
वय ३४ वर्षे, व्यवसाय- गृहिणी
२) श्री. ओजस गौरव काळबेरे
वय ३ वर्षे,
अर्जदार क्र. २ करिता अ.पा.क. — अर्जदार
अर्जदार क्र. १ - आई
अर्जदार क्र. १ व २ राहणार
मु.साईनगर, बोर्लीपंचतन
पो.बोर्लीपंचतन, ता.श्रीवर्धन, जि.रायगड

विरूद्ध

२) श्री. प्रकाश पांडुरंग काळबेरे
वय ५६ वर्षे, व्यवसाय एजंट
रा. मु. साईनगर, बोर्लीपंचतन — सामनेवाला
पो. बोर्लीपंचतन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड

सर्व जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे साईनगर, पो. बोर्लीपंचतन, ता. श्रीवर्धन, जि. रायगड येथील मयत कै. गौरव प्रकाश काळबेरे, यांचे दिनांक २०/१२/२०२४ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात मयताचे वारस अर्जदार क्र. १ व २ हे आहेत. मयत कै. गौरव प्रकाश काळबेरे यांचा एम. जी. एम. हॉस्पिटल, कामोठे, पनवेल येथे मृत्यू झालेला आहे. तरी त्यांच्या निधानानंतर त्याच्या पश्चात त्यांचे नावे असलेल्या शासकिय, निमशासकीय कार्यालयात व त्यांचे नावावर असलेली MH 06 CL 9297 हे चार चाकी वाहन, MH 06 BS 9297 हे दुचाकी वाहन ही वाहने अर्जदारांच्या नावावर करण्याकरिता अर्जदार हे कायदेशिर वारस असल्याबाबतचा सक्षम न्यायालयाचा वारस दाखला आणण्यास सांगितले. अर्जदार यांना वारस दाखल्याची आवश्यकता असल्याने वारस दाखला मिळण्या करिता मे. कोर्टात अर्जदाखल केलेला आहे. सदरचा वारस दाखला अर्जदारांना देण्याबाबत कोणाचीही कसली प्रकारची हरकत असल्यास हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत लेखी हरकत घेण्यात यावी. अन्यथा मागाहून येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नसून अर्जदार यांना वारस दाखला देण्यात येईल.

आज दिनांक २९/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी जाहीर नोटीस प्रसिद्ध केली.

श्रीवर्धन
ता. २९/१२/२०२५

सही/- — शिक्का — सही/-
**क.लिपीक, दिवाणी न्यायालय,श्रीवर्धन** — **सहाय्यक अधीक्षक, दिवाणी न्यायालय, श्रीवर्धन**

## जाहीर नोटीस

दिनांक : ३० डिसेंबर २०२५

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आम चे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिध्द झाल्या पासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे खरवंडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे-आर-पॉ | आकार रु.-पै. |
|---|---|---|---|---|
| तेजश्री वैभव थोरात<br>प्रतीक सदानंद शेट्टी | ११ | ० | २-०९-०० | ५-०६ |

यापैकी लिहून देणार यांच्या मालकीचे विक्री केलेले क्षेत्र हे ०आर ४८ पॉ००मात्र.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. — सही /-
कार्यालयीन पत्ता :- मु.पो. कशेळे, — **ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, — मो.नं. ९१५८२७७७२८
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१ — दिनांक :-३०/१२/२०२५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे- मोठे वेणगाव ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आम्ही त्याचे खालील नमूद विद्यमान मालक यांच्या कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. . | हि.नं. | क्षेत्र. हि.आर.चौ.मी | आकार रू. पै. |
|---|---|---|---|---|
| उर्वी उमेश मिसाळ<br>मानस सौदान हुलगे<br>स्नेहल उमेश मिसाळ | ९० | १ | ०-४९-०० | ८=६९ |

तरी वरील मिळकती संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, बक्षिस, वारस हक्क, पोटगी, लीन, चार्ज, ताबा, वहिवाट अथवा कोणत्याही स्वरूपाचा कसलाही हक्क हितसंबध असल्यास त्यांना ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत खालील सही करणार यांचे पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात हरकत घ्यावी. वरील मुदतीत कोणाचाही लेखी हरकत न आल्यास सदरील मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो सोडून दिला आहे असे समजून सदरील मिळकती निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजुन आम्ही सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पुर्ण करू मागाहुन मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमच्यावर बंधनकारक राहणार नाहीत. हे सर्वांस कळावे.

ठिकाण :- कर्जत
दिनांक :-३०/१२/२०२५

**के सी लक्ष्मी नरसिम्हण**
अर्चना नरसिम्हण
२२०१ इडन वुडस् हौसिंग सोसायटी, शास्त्री नगर
अंधेरी वेस्ट मुंबई पोस्ट-आझादनगर
मो : ८०९७४५७९७८
९३७०१४५९७४

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे नागझरी, ता.अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक विलास नरेंद्र कदम वैगरे ४ रा.भांडुप मुंबई यांच्या नांवे असलेली सामाईक मालकी हक्काची व त्यांचे ताबे कब्जातील व वहिवाटीतील खालील वर्णन केलेली मिळकत माझे अशिल श्री. समिर शरद चौबळ रा. मु. पो. पोयनाड, ता.अलिबाग, जि.रायगड यांना कायमस्वरूपात विकत देण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाचा साठेकरार विद्यमान मालकांबरोबर झालेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| नागझरी<br>ता.अलिबाग<br>जि.रायगड | ११४ | ०-५३-६०<br>पो.ख.०-००-६०<br>एकुण क्षेत्र ०-५४-२० | ५.७० |

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहु मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासुन चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहु मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहित धरून माझे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

तारीख :- ३०/१२/२०२५ — सही /-
**ॲड. विक्रांत विनायक पाटील**
रा. म्हात्रोळी, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड
मो.नं. ८३२९४६१५४०

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
(भारत सरकारचा उपक्रम)

सादर सेवा

**रोजगार अधिसूचना**

कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड ने अभियांत्रिकी विभागात सहाय्यक अभियंता पदासाठी निश्चित मुदतीच्या कराराच्या आधारावर **वॉक-इन-इंटरव्ह्यूद्वारे** अधिसूचना जारी केली आहे. तपशील खालीलप्रमाणे आहेत:

**रोजगार अधिसूचना सं. सीओ/पी-आर/13सी/2025 दिनांक 19.12.2025**

| क्र. सं. | पदाचे नाव | यूआर | पदांची एकूण संख्या | वॉक-इन-इंटरव्यू ची तारीख |
|---|---|---|---|---|
| 1 | सहाय्यक अभियंता | 1 | 1 | 06.01.2026 |

उमेदवार अधिसूचना, पात्रता निकष इत्यादींच्या तपशीलांसाठी केआरसीएल वेबसाइट **www.konkanrailway.com** वर लिंक ➔ भर्ती ➔ वर्तमान अधिसूचना ला भेट देऊ शकतात आणि अर्ज करू शकतात.

**मुख्य कार्मिक अधिकारी**

## जाहीर नोटिस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे भोईवाडी, तालुका कर्जत, जिल्हा-रायगड येथील खाली वर्णन असलेली जमीन मिळकत यांनी विद्यामान मालक व कब्जेदार यांचे कडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,

**मौजे भोईरवाडी, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड येथील**

| मालक | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| राजन मोरेश्वर कुलकर्णी<br>रमा राजन कुलकर्णी | १/अ/१/ब/२/४ | ०-५३-१० | ६.०५ |
| राजन मोरेश्वर कुलकर्णी | ४९/२ | ०-१०-०० | ०.१२ |
| राजन मोरेश्वर कुलकर्णी | ५०/१५ | ०-१६-०० | ०.१७ |
| राजन मोरेश्वर कुलकर्णी | ५०/१४/अ/१ | ०-३५-०० | ०.४१ |
| राजन मोरेश्वर कुलकर्णी | ५०/१४/अ/२ | ०-५०-०० | ०.५० |
| सुनिलकुमार नंदलाल शहा | ४८/१ | ०-८८-९०पैकी<br>०-२०-००क्षेत्र | २.५७ |

तरी सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचाही कोणत्याही प्रकारे साठेकरार, खरेदीखत, कुळखत्यार पत्र, बक्षीस पत्र, गहाण खत करारनामा अथवा इतर हक्का हितसंबंध अगर सदरील व्यवहारास कोणाचीही कोणत्याही प्रकारे हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पुराव्यासह खालील सही करणारे यांचेकडे ही नोटिस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत नोंदवावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास व नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून सदरील व्यवहार पूर्ण केला जाईल. व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

दिनांक ३०/१२/२०२५
येणेप्रमाणे जाहीर नोटिस — सही / -

**Adv. Aysha Hyka Saleem**
ऑफिस - ४०१-४०५, आय विंग,
अरेंज प्लाझा, प्लॉट नं.५२, सेक्टर १५,
सी.बी.डी. बेलापुर, ठाणे, नवी मुंबई ४००६१४
मो.नं. ८६९२०३८५६७

## जाहीर नोटीस

दिनांक : ३० डिसेंबर २०२५

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकाकडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्यहरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे बोरीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे आर-पॉ | आकार रु.-पै. |
|---|---|---|---|---|
| सुरेश हरिश्चंद्र भोईर | ५६ | ८ | ०-२३-०० | ०-२० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. — सही / -
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, — **ॲड. भुपेश तानाजी पेमारे**
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, — मो.नं. ९१५८२७७७२८
ता.कर्जत, जि.रायगड. ४१०२०१ — दिनांक :- ३०/१२/२०२५

## जाहीर नोटीस

दिनांक : ३० डिसेंबर २०२५

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालका कडुन कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्त्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदती मध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे बोरीवली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे आर-पॉ | आकार रु.-पै. |
|---|---|---|---|---|
| मंगेश गोपीनाथ भोईर | ५६ | ७ | ०-२२-०० | ०-२० |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे. — सही / -
कार्यालयीन पत्ता :- मु. पो. कशेळे, — **ॲड.भुपेश तानाजी पेमारे**
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर, — मो. नं. ९१५८२७७७२८
ता. कर्जत, जि. रायगड. ४१०२०१ — दिनांक :- ३०/१२/२०२५

## जाहिर नोटीस

सर्व तमाम जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येत की, मौजे ढाक ता. कर्जत, जि. रायगड यांचे प्रत्यक्ष ताबा कब्जा, वापरवहिवाटीची मालक म्हणुन श्री अरूण महादेव धारप रा. नेरळ ता. कर्जत, जि. रायगड यांची ७/१२ सदरी नोंद असलेली खालील वर्णनाची जमिन मिळकत ही आमचे अशिलांनी खरेदी घेण्याचे ठरविले आहे. तिचे वर्णन खालीलप्रमाणे:-

| गावाचे नांव | मालकाचे नांव | सर्व्हे नं. हिस्सा नं. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|---|
| ढाक<br>ता.कर्जत,<br>जि.रायगड | श्री. अरूण महादेव धारप | १२/५ | ०-३७-२०<br>पो.ख ००-१०-४०<br>एकुण ००-४७-६०<br>पैकी ७/१२ सदरी मालक म्हणुन फेरफार क्र. ३६४ ने नमुद असलेले श्री अरूण महादेव धारप यांचे मालकी हिस्स्याचे विक्री क्षेत्रफळ ०.२०.०० | २.२८ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत ही वरील नमुद जमिन मालकांडून आमचे अशिल यांनी कायम मालक म्हणुन विकत घेण्याचे ठरविले आहे तरी सदरहु जमिनीचा टायटल सर्चचा भाग म्हणुन प्रस्तुतची नोटीस दिली असुन सदर व्यवहारास कुणाचाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास ती हरकत लेखी व कागदोपत्री पुराव्यासह मी खाली सही करणार खरेदीदाराचा वकील म्हणुन नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ७ दिवसांचे आत नमुद पत्त्यावर दाखल करावी. मुदतीत न आलेल्या हरकती व पुराव्यांशिवाय आलेल्या हरकती माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व मग सदर व्यवहारास कुणाचीही कुठल्याही प्रकारची हरकत नाही वा असलेल्या हरकती सोडुन दिल्या आहेत असे समजून माझे अशील सदर जमिन मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पुर्ण करतील व सदर व्यवहार सर्व संबधितांवर बंधनकारक राहील याची तमाम जनतेने नोंद घ्यावी.

दि. २९/१२/२०२५ — अशिलातर्फे वकील
पत्ता — **ॲड.भारती निवृत्ती ढाकवळ**
धापया मंदीरा समोर
देशमुख हाउस दगडे अळी ता.कर्जत, जि.रायगड
मो. नं. ९२७३४९९४३८, ९९२१२९६४६६

## जाहिर नोटिस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसने कळविण्यात येते की, आमचे अशिल हे खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालकाकडुन कायम खरेदी करणार असुन तशी बोलणी आमचे अशिल व मिळकतीचे मालक मध्ये सुरू आहे....

**मिळकतीचे वर्णन**

**मालकाचे नाव** : १) विपुल रमेश देवळेकर
रा. मु. बहुलेवाडी, ता. तळा, जि. रायगड

| मौजे | गट.नं | भो.ग.वर्ग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|---|
| बहुलेवाडी | १८२ | १ | ०.४८.००<br>०.०७.००<br>०.५५.०० | ०.२५ |

तिचे कोणतेही भागावर कोणाचेही विक्री गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचाकरार, वारसा, हक्क, लिज, चाज, पोटगी, वहिवाट, (जाण्या-येण्याचा मार्ग), इजमेंटरी या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे हक्क, हितसंबंध असल्यास अथवा कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीची विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी हरकत अगर तक्रार ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांच्या आत सही करणार यांचेकडे लेखी स्वरूपात योग्य ते कागदपत्रे पुराव्या सहीत सादर करावे.

मुदतीत कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहित धरून आमचे आशिल व्यवहार पुर्ण करतील व मागाहुन कोणाचीही तक्रार हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही हे सर्वास कळावे.

माणगांव — सही /-
दिनांक :- २९/१२/२०२५ — Adv. P. M. Jadhav
B.Com., L.L.B.
At. Post. Indapur, Tal. Mangoan,

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to public at large that my Clients have entered into an negotiations with the Owners being (1) Mr. Ashok Narayan Patil (2) Mr. Vijay Narayan Patil, (3) Mr. Nikhil Nitin Mhatre, (4) Smt. Pooja Nitin Mhatre and (5) Smt. Kalyani Kishor Patil of the property more particularly described in the First Schedule hereunder written ("Property") and further is proposing to purchase said Property from them, as mentioned in First Schedule hereunder written and therefore, on instructions, I am issuing this public notice :-

All person(s), claiming or having any share, right, title, estate, interest, claim or demand whatsoever to or in respect to the Property or any part thereof, whether by way of sale, ownership, transfer, assignment, tenancy, sub- tenancy, lease, sub-lease, license, gift, release, exchange, family arrangement, possession, mortgage, charge, encumbrance, lien, inheritance, succession, bequest, easement, order/ decree/judgment of court, attachment, writing or otherwise of any nature whatsoever are hereby required to make the same known in writing to the undersigned at the within mentioned address and within 14 (fourteen) days from the date of publication hereof, with notarised documentary evidence on which they are basing and asserting their rights with respect to the Property or any part thereof, failing which, such claim, demand, right, title, interest, dispute, demand or objection, if any, shall be deemed to have been waived and/ or abandoned to all intents and purposes.

**THE FIRST SCHEDULE ABOVE REFERRED TO:**
**(Description of the said Property)**

All that piece and parcel of the agricultural land bearing Bhumapan Kramank/ Upavibhag 48/1 admeasuring 1.29.20 Akak H.R. Sq. Mtrs. (including Pot Kharab/Fallow Land admeasuring 0.15.20 Akak H.R. Sq. Mtrs.), Assessed to Rs. 17.80 Ps., being, lying and situate at Village Narangi, Taluka Alibag and District Raigad.

**Adv. S. Y. Bartake**
Adv. S. S. Bartake
Office At B/202, Kuberakshe C.H.S., Near Maruti Naka,
Alibag, Taluka Alibag, District Raigad, 402 201.

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालय, ता.पेण. जि.रायगड**

दुरध्वनी क्रमांक : ०२१४३-२५२०३६, Email id - tahasilpen@gmail.com
महसूल शाखा-क्र.फौजदारी/कात-४/मृत्यु दाखला/दा.क्र.३५४/२०२५
दिनांक :- ३०/१२/२०२५

**जाहिरनामा**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

बाळया नथु पवार, — अर्जदार
रा.तिलोरे, ता.पेण, जि.रायगड

विरुद्ध

ग्रामपंचायत वरवणे, — सामनेवाला
ता.पेण, जि.रायगड

या जाहीर नोटीशीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांची आई साली नथु पवार यांचा मृत्यु दिनांक ०८/१०/१९८५ रोजी मौजे तिलोरे, ता.पेण,जि.रायगड येथे झाला असून त्यांच्या मृत्युची नोंद ग्रामपंचायत वरवणे, ता.पेण,जि.रायगड यांचेकडे झालेली नसल्याने मृत्यु नोंद घालणेसाठी या कार्यालयांत अर्ज दाखल केला आहे. तरी या अर्जाची चौकशी तात्काळ करावयाची असल्याने याकामी जर अर्जदार यांच्या आईच्या मृत्युची नोंद घालण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पुढील १५ दिवसांत कार्यकारी दंडाधिकारी पेण यांचे कार्यालयांत समक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडावे. कोणाचेही म्हणणे किंवा आक्षेप या कार्यालयांत मुदतीत प्राप्त न झाल्यास अर्जावर उपलब्ध पुरावे, कागदपत्र विचारात घेऊन अर्जदार यांना उशिरा मृत्यु नोंद दाखला देणेबाबत पुढील कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही /-
**(तानाजी शेजाळ)**
**तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी पेण**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल १. श्रीमती बारकुबाई उर्फ जयवंती जनार्दन माने रा. मांडवा, ता. अलिबाग, जि. रायगड २. केशर यशवंत पाटील रा. सारळ, ता. अलिबाग, जि. रायगड यांचे सुचनेवरुन सर्व लोकांना कळविण्यात येते की, आमचे अशिलांची फसवणूक करुन श्री. प्रदिप परशुराम म्हात्रे रा. मांडवा, ता. अलिबाग, जि. रायगड यांने आमचे अशिलांचे मालकीचे मौजे धोकवडे गट नं. २८३ व २०५ या मिळकतीबाबत दि. १०/८/२०१८ रोजी कुळ अखत्यारपत्र त्या अशिक्षित आहेत याचा गैरफायदा घेवून तसेच त्यांना लिहीता वाचता येत नाही याचा गैरफायदा घेवून करुन घेतले होते व त्या कुळ अखत्यारपत्राचा गैरवापर सदर इसमांने चालू केले असल्याने आमचे अशिल या जाहीर नोटीसने दि. १०/८/२०१८ रोजीच वर नमूद कुळ अखत्यारपत्र कायमचे रद्द करीत आहेत व प्रदिप परशुराम म्हात्रे यांना सुचित करण्यात येत आहे की, सदर तथाकथीत दि. १०/८/२०१८ रोजीचा कुळ अखत्यारपत्राचा गैरवापर पुढे करु नये व इतर कुणीही वर नमूद मिळकतीबाबत कोणताही व्यवहार व कागदपत्रे श्री. प्रदिप परशुराम म्हात्रे यांचेसोबत करू नये अन्यथा संबंधित इसमांबरोबर आमचे अशिल कायदेशीर कारवाई करतील. हे कळावे.

अलिबाग, — सही/-
दि. २९-१२-२०२५. — **ॲड. आर. बी. कोसमकर**
चिरायु, ब्राम्हणआळी, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड.

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे दहिवली तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्कनोंदीस वर्णन असलेली बिनशेती प्लॉट मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक शर्मिला दिपक दत्ता यांचेकडुन विकत घेण्याचे ठरविले. सदर जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे दहिवली तर्फे निड, ता. कर्जत, जि. रायगड येथील बिनशेती प्लॉट मिळकत**

| स.नं. | प्लॉट नं. | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| १२८ | ३६ | ५.०२.०० | १०-०४ |

तरी वरील मिळकतीच्या बाबत कोणाचीही वहिवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाण, बक्षीस, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, कुल अखत्यारपत्र अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी दाखल कराव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. सदर मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदरचा व्यवहार पुर्ण केला जाईल व त्यानंतर येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत
ता. ३०/१२/२०२५ — खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**किशोर तुकाराम देशमुख**
प्रेरणा निवास, नाना मास्तर नगर,
मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड ४१०२०१
मो. ९४२२०६८७५५

प्रोसेस जमा — अर्जदारातर्फे वकिल
दि. — ॲड.अनिकेत एच.गुरव

**अलिबाग येथील मे.सह दिवाणी न्यायाधिश क-स्तर सो.**
**श्रीमती एस.ए. पर्वतकर सो यांचे कोर्टात**

दि.चौ.अर्ज नं.२०४/२०२५
**जाहीर नोटीस** — नि. ४/ड

१) श्री. राजकुमार जयंत वाळंज
२) श्री. हेमंत जयंत वाळंज — अर्जदार
३) श्रीमती संध्या प्रदीप वाळंज
४) श्री. कौस्तुभ प्रदीप वाळंज

विरूद्ध

कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील अर्जदार नं. १ ते ४ यांनी कै. सुमती जयंत वाळंज यांचे मृत्युपश्चात पुढील नमुद मिळकतीबाबत वारस दाखला (हेअरशीप सर्टिफिकेट) मिळणेकरीता मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे.

अलिबाग नगरपरिषद हद्दीतील मौजे अलिबाग, तालुका अलिबाग जिल्हा रायगड येथील श्रीबाग क्षेत्रविकास योजना नं. २ मधील भुखंड नं. एम-२९ या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या 'साईलिला सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत'या इमारतीमधील तळमजल्यावरील निवासी सदनिका नं.१, बिल्टअप क्षेत्रफळ ९१० चौरस फुट, ज्यासी अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्रमांक ALB000002630, (जुना नं.Z1ASB2002652, जुना घर नं.७३ब/श्रीबाग २).

तरी अर्जदाराच्या मागणीप्रमाणे त्यांना वारस दाखला (हेअरशीप सर्टिफिकेट) देण्यास कोणत्याही व्यक्तीची, कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्यांचे आत किंवा दि. १२/०१/२०२६ पर्यंत स्वतः किंवा त्यांचे वकिलांमार्फत हजर राहून आपली हरकत कळवावी. वर दिलेल्या मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास अर्जदार यांस त्यांचे मागणीप्रमाणे वारस दाखला (हेअरशीप सर्टिफिकेट) देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे समजण्यांत येवून मे. कोर्ट आवश्यक तो वारस दाखला (हेअरशीप सर्टिफिकेट) देणेचा हुकूम अर्जदार नं. १ ते ४ यांचे लाभांत करेल त्याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दि.२९/१२/२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

सही/- — सही/-
**कनिष्ठ लिपीक, दिवाणी न्यायाधिश व. स्तर अलिबाग** — **अधिक्षक, दिवाणी न्यायालय व. स्तर अलिबाग**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की आमचे अशिल श्री दिपक ईश्वरलाल हिरा, रा. चिंतामणी पॅलेस ब्लॉक नंबर ७/८ नानामास्तर नगर मुद्रे कर्जत यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत विद्यमान मालकाकडून कायम खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. सदरहू शेती मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे - वावे, तालुका - कर्जत, जिल्हा - रायगड**

| जमिन मालकाचे नाव | स.नं/हि नं | क्षेत्र, हे आर प्रति | आकार रू पै |
|---|---|---|---|
| जगदीश रामचंद्र ठाणगे<br>योगेश रामचंद्र ठाणगे<br>विश्वास रामचंद्र ठाणगे<br>शरद रामचंद्र ठाणगे<br>सुनिल नामदेव ठाणगे<br>माई विठ्ठल थोरवे<br>रघुनाथ बगाराम शिंदे<br>गुलाब लक्ष्मण भरकले<br>अशोक बगाराम शिंदे<br>मुक्ताबाई मोतीराम बोराडे<br>केतन मोतीराम बोराडे<br>कांचन गणेश पाटील<br>सुरेश दामु बोराडे<br>मजांबाई भिका दिसले<br>शोभा बळीराम सावंत | १३/९ | ००-०२-०० | ० रू ०३ पै |
| | २८/६ अ | ००-४०-९० | ०४ रू ५०पै |
| | ३१/२ क | ००-३४-६० | ४ रू १२ |
| | ३१/२ अ | ००-३७-७० | ४ रु ८१ |
| | २९/७ | ००-०१-०० | ० रू ०३ पैसे |
| | २९/६ | ००-०२-५० | ० रू २५ पैसे |
| | ३०/१ | ००-१३-१०<br>एकूण क्षेत्र ०१-३१-८०<br>हे आर प्रति | ० रू ६६ पैसे |

सदरहू वर नमूद केलेली शेती मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांचे मालकीची वाडवडीलोपार्जित व तावे कब्जा वहीवाटीची आहे असे ते सांगतात व विद्यमान ७/१२ उताऱ्यावरून तसेच दिसते. सदर शेती मिळकत त्यांचेकडून आमचे अशिलांनी तदंगभूत सर्व हक्कांगासह कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर शेती मिळकतीत कोणाचा काही गहाण, दान, साठेकरार, बक्षिस, फरोक्तखत, लिज वगैरे प्रकारचा हक्क वा कुळ हक्क, अन्न वस्त्र बोजा असल्यास त्याने तसे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसाचे आत खालील पत्त्यावर लेखी कळवावे. वरील मुदतीत कोणाची काहीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल. व मागाहून येणारी कोणतीही तक्रार ऐकली जाणार नाही.

ता. २९/१२/२०२५ — सही/-
**ॲड सतीश अर्जुन शेळके**
(बी.ए.एल.एल.बी)
मुंबई हायकोर्ट ऑफीस पत्ता- नारायण देशमुख हाऊस दगडे आळी कर्जत पूर्व
कर्जत - रायगड मो. नं. ९८८११३२२४८

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**

# भारताचा श्रीलंकेवर सलग चौथा विजय

## महिला संघाची ३० धावांनी मात; मालिकेत ४-० ने आघाडी




**| तिरुवनंतपुरम | वृत्तसंस्था |**

वूमन्स टीम इंडियाने हरमनप्रीत कौर हीच्या नेतृत्वात विजयी घोडदौड कायम राखली आहे. टीम इंडियाने तिरुवनंतपुरममधील ग्रीनफिल्ड स्टेडियममध्ये श्रीलंकेविरुद्धच्या चौथ्या टी २० सामन्यात ३० धावांनी विजय मिळवला आहे. टीम इंडियाने श्रीलंकेसमोर २२२ धावांचं आव्हान ठेवलं होतं. श्रीलंकेने या धावांचा पाठलाग करताना चांगली झुंज दिली. मात्र भारतीय गोलंदाजांसमोर श्रीलंकेला २०० पार मजल मारता आली नाही. श्रीलंकेने २० ओव्हरमध्ये ६ विकेट्स गमावून १९१ धावा केल्या. भारताने अशाप्रकारे सलग चौथा विजय मिळवला. भारताने यासह या ५ सामन्यांच्या मालिकेत ४-० ने आघाडी घेतली.

**स्मृती-शफालीची दीडशतकी भागीदारी**

श्रीलंकेने टॉस जिंकून टीम इंडियाला बॅटिंगसाठी भाग पाडलं. स्मृती मंधाना आणि शफाली वर्मा या सलामी जोडीने टीम इंडियाला चाबूक सुरुवात करुन दिली. त्यानंतर रिचा घोष आणि कॅप्टन हरमनप्रीत कौर या दोघींनी भारताला २२० पार पोहचवलं. स्मृती आणि शफाली या सलामी जोडीने ९२ बॉलमध्ये १६२ रन्सची पार्टनरशीप केली. त्यानंतर शफाली आणि दुसऱ्याच ओव्हरमध्ये स्मृती आऊट झाली.

शफालीने ४६ बॉलमध्ये १ सिक्स आणि १२ फोरसह ७९ रन्स केल्या. शफालीने १६६.६७ च्या स्ट्राईक रेटने ही खेळी केली. तर स्मृतीने ४८ चेंडूत ११ चौकार आणि ३ षटकारांसह ८० धावा केल्या. त्यानंतर हरमनप्रीत आणि ऋचा या दोघींनी २३ बॉलमध्ये ५३ रन्सची नॉट आऊट पार्टनरशीप केली. रिचाने १६ बॉलमध्ये ४ फोर आणि ३ सिक्ससह नॉट आऊट ४० रन्स केल्या. तर हरमनप्रीतने १० चेंडूत नाबाद १० धावा केल्या.

**श्रीलंकेला चांगल्या सुरूवातीनंतरही अपयश**

त्यानंतर विजयी धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेसाठी टॉप ऑर्डरमधील फलंदाजांनी चांगली सुरुवात केली. श्रीलंकेच्या फलंदाजांनी पहिल्या २ विकेटसाठी अर्धशतकी भागीदारी केली. त्यामुळे श्रीलंकेच्या चाहत्यांना विजयाची आशा होती. पहिल्या २ विकेटनंतर टीम इंडियाच्या गोलंदाजांनी श्रीलंकेला ठराविक अंतराने झटके दिले. त्यामुळे श्रीलंकेला चांगल्या सुरुवातीनंतरही २० ओव्हरमध्ये २०० धावाही करता आल्या नाहीत. श्रीलंकेला ६ विकेट्स गमावून १९१ धावाच करता आल्या.

**टीम इंडियाची विजयी घोडदौड कायम**

श्रीलंकेसाठी कॅप्टन चमारी अट्टापट्टू हीने सर्वाधिक ५२ धावा केल्या. त्याव्यतिरिक्त हसिनी परेरा हीने ३३ धावांचं योगदान दिलं. तर मिडल ऑर्डरमधील फलंदाजांना आश्वासक सुरुवात मिळाली. मात्र भारतीय गोलंदाजांनी त्यांना वेळीच आऊट केलं आणि मैदानाबाहेरचा रस्ता दाखवला. टीम इंडियाकडून अरुंधती रेड्डी आणि वैष्णवी शर्मा या दोघींनी प्रत्येकी २-२ विकेट्स मिळवल्या. तर श्री चरणी हीने १ विकेट मिळवली.

## टीम इंडियाच्या त्रिकुटाची विक्रमी कामगिरी

वूमन्स टीम इंडियाने श्रीलंकेविरुद्धच्या चौथ्या टी २० सामन्यात ३० धावांनी विजय मिळवला. भारताने या विजयासह ५ सामन्यांच्या मालिकेत ४-० ने आघाडी मिळवली. ओपनर स्मृती मंधाना, शफाली वर्मा आणि ऋचा घोष या तिघींनी भारताच्या या विजयात बॅटिंगने प्रमुख योगदान दिलं. या तिघींनी तोडफोड खेळी करत भारताला २२१ धावांपर्यंत पोहचवलं. शफाली आणि स्मृती या दोघींनी य सामन्यात ५० पेक्षा अधिक



धावा केल्या. तर ऋचा घोष हीने अखेरच्या क्षणी फटकेबाजी करत फिनिशिंग टच दिला. स्मृती, शफाली आणि ऋचा या तिघींनी केलेल्या तडाखेदार खेळीच्या जोरावर भारताने या सामन्यात काही विक्रम केले आहेत.

**टीम इंडियाने काय काय केलं?**

भारतीय महिला संघाने २२१ धावा केल्या. भारताने यासह टी २० क्रिकेटमध्ये आपला सर्वोच्च धावसंख्येचा विक्रम प्रस्थापित केला. याआधी भारताची टी २० फॉर्मेटमध्ये ४ बाद २१७ ही सर्वोच्च धावसंख्या होती. महिला संघाने वेस्ट इंडिज विरुद्ध २०२४ मध्ये नवी मुंबईत ही कामगिरी केली होती. तर भारताची २०५ ही तिसरी सर्वोच्च धावसंख्या आहे. भारताने २०२५ मध्येच ही धावसंख्या उभारली होती. टीम इंडियाने २२१ धावांच्या खेळीत २८ चौकार आणि ८ षटकार लगावले.

---

# निवडक

## माजी क्रिकेटपटू मॉरिस यांचे निधन

**इंग्लंड** : इंग्लडचे माजी क्रिकेटपटू तथा इंग्लंड क्रिकेट बोर्डाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी ह्यू मॉरिस यांचं निधन झालं आहे. ६२ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या काही वर्षांपासून ते आजारी होते. त्यांना आतड्यांचा कॅन्सर झाला होता. त्यांच्यावर उपचार सुरु होते. मात्र, रविवारी त्यांची प्राणज्योत मालवली. ग्लॅमॉर्गन क्रिकेट क्लबने रविवारी यासंदर्भात माहिती दिली आहे. ह्यू मॉरिस यांनी १९९१ मध्ये इंग्लंडसाठी



तीन कसोटी सामने खेळले होते. त्यानंतर दोन वर्षांनी कर्णधार म्हणून त्यांन ग्लॅमॉर्गन संघाला संडे लीगचे विजेतेपद मिळवून दिले. खेळाडू म्हणून कारकीर्द संपल्यानंतर मॉरिस यांनी मध्ये विविध वरिष्ठ पदांवर काम केले. मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम केल्यानंतर, २००७ मध्ये त्यांनी इंग्लंड संघाचे व्यवस्थापकीय संचालक म्हणून जबाबदारी स्वीकारली. मॉरिस व्यवस्थापकीय संचालक असताना इंग्लंड पुरुष क्रिकेट संघ कसोटी क्रमवारीत अव्वल स्थानी पोहोचला. तसेच तीन ॲशेस मालिका जिंकल्या. याशिवाय इंग्लडने २०१० चा टी-२० विश्वचषकही जिंकला. अशातच जानेवारी २०२२ मध्ये मॉरिस यांना आतड्यांच्या कर्करोगाचे निदान झाले. उपचारादरम्यान कुटुंबासोबत अधिक वेळ घालवण्यासाठी त्यांनी सप्टेंबर २०२३ मध्ये वेल्श काउंटीतील आपल्या पदाचा राजीनामा दिला.

## गौतम गंभीरच कसोटीचे प्रशिक्षक

**नवी दिल्ली** : मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय पुरुष क्रिकेट संघाला कसोटी प्रकारात निराशेला सामोरे जावे लागले. एकदिवसीय व टी-२० प्रकारात यश मिळवणाऱ्या टीम इंडियाला कसोटीत अपयशाचा सामना करावा




लागला आहे. याच पार्श्वभूमीवर भारताचे कसोटी संघाचे प्रशिक्षक बदलले जाणार, अशी चर्चा रंगू लागली. याप्रसंगी भारतीय कसोटी संघाच्या प्रशिक्षण स्टाफमध्ये बदल करण्याबाबत बीसीसीआयकडून कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही, असे स्पष्ट मत बीसीसीआयचे सचिव देवाजित सैकिया यांनी व्यक्त करीत सर्व शंकाकुशंकांना पूर्णविराम लावला आहे. भारतीय क्रिकेट संघाला गेल्या वर्षी न्यूझीलंडविरुद्ध कसोटी मालिकेत ३-० अशी हार पत्करावी लागली. त्यानंतर यंदा दक्षिण आफ्रिकन संघाविरुद्ध २-० असा पराभव स्वीकारावा लागला. देवाजित सैकिया यांनी या वेळी स्पष्ट मत व्यक्त करताना म्हटले, की भारताच्या कसोटी संघातील प्रशिक्षक विभागात बदल करण्यात येणार आहे, अशा प्रकारचे वृत्त काही माध्यमांमधून समोर आले आहे. हे चुकीचे व निराधार आहे. बीसीसीआयकडून याचे खंडन करण्यात येत आहे.

## मुंबईकडून खेळले दोन रोहित शर्मा?

**मुंबई** : विजय हजारे ट्रॉफीमध्ये मुंबईकडून खेळणाऱ्या रोहित शर्मासारखा दिसणारा क्रिकेटपटू हार्दिक तामोरे आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमुळे दोन रोहित शर्मा खेळत असल्याचा भास झाला. मुंबई विरुद्ध सिक्कीम सामन्यादरम्यानचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला. या व्हिडिओमुळे मुंबईकडून दोन रोहित शर्मा खेळतायेत का की हा व्हिडिओ खोटा आहे, असा प्रश्न चाहत्यांना पडला होता. खरंतर मुंबईकडून एकच रोहित शर्मा खेळत होता, मात्र मुंबईचाच यष्टीरक्षक फलंदाज हार्दिक तामोरेदेखील रोहितसारखाच काहीसा दिसत असल्याने दोन रोहित शर्मा खेळत असल्याचा भास या व्हिडिओ आणि फोटोंमध्ये होत होता. हार्दिक तामोरे हा २८ वर्षीय फलंदाज असून ५ वर्षांपासून मुंबईकडून खेळत आहे. सिक्कीमविरुद्धच्या सामन्यात तो मुंबईसाठी यष्टीरक्षण करत होता, तर रोहित शर्मा त्याच्याच जवळ उभा राहून क्षेत्ररक्षण करत होता. त्यावेळीचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल झाले. तथापि, याच व्हायरल फोटो आणि व्हिडिओला काही युझर्सने एडिट करत हार्दिकचा चेहरा अगदीच रोहित शर्मासारखा केल्याचाही दावाही अनेकांना सोशल मीडियावर केला आहे. दरम्यान, मीडियाशी बोलताना हार्दिकने सांगितले की रोहित आदर्शच आहे, कोणी त्याच्याशी तुलना केली, तर चांगले वाटते. पण त्याच्यासारखं मी ३ टक्के जरी बनू शकलो, तर चांगले वाटेल.

---

## विजय मर्चंट चषक ; फलंदाजांसमोर आव्हान

# नील चंद्रात्रेची फिरकीवर छाप

**| नाशिक | प्रतिनिधी |**

देशभरातून विविध स्पर्धांच्या माध्यमातून अनेक दर्जेदार युवा क्रिकेटपटू पुढे येत आहेत. या खेळाडूंवर आयपीएलमध्ये सहभागी संघांचीही नजर राहत असल्याने त्यांना आपला खेळ अधिक उंचावण्यासाठी उत्तेजन मिळत आहे.

बिहारचा वैभव सूर्यवंशी, मुंबईचा आयुष म्हात्रे, नाशिकचा साहिल पारख ही काही नावे सांगता येतील. या तीनही खेळाडूंच्या पंगतीत लवकरच नाशिकच्या एका अष्टपैलू खेळाडूचे नाव दिसल्यास नवल वाटू नये, अशी कामगिरी सध्या या खेळाडूकडून होत आहे.

वैभव सूर्यवंशी, आयुष म्हात्रे, साहिल पारख हे आपल्या आक्रमक फलंदाजीसाठी ओळखले जातात. परंतु, नाशिकचा १६ वर्षांआतील हा कोवळा खेळाडू त्याच्या फिरकी गोलंदाजीसाठी ओळखला जाऊ लागला आहे. तो उपयुक्त फलंदाजही आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या १६ वर्षांखालील विजय मर्चंट चषक क्रिकेट स्पर्धेत सध्या हा गोलंदाज आपल्या फिरकीवर विरोधी बाजूच्या फलंदाजांना नाचवत आहे. महाराष्ट्राने सौराष्ट्र आणि हिमाचल प्रदेश विरुद्ध विजय मिळविले.

नाशिकच्या या कोवळ्या फिरकीपटूचे नाव नील चंद्रात्रे आहे. त्याची फिरकी फलंदाजांना गोंधळात टाकत आहे. आंध्र प्रदेशातील मुलापडू येथे १६ वर्षांखालील विजय मर्चंट चषक क्रिकेट स्पर्धेत एलिट गटात महाराष्ट्राचे साखळी सामने, होत आहेत. सौराष्ट्रविरुद्ध झालेल्या सामन्यात पहिल्या डावात महाराष्ट्राने ४१६ धावांचा डोंगर रचला. त्यात प्रज्वल मोरेच्या १६५ धावांचा समावेश होता. नील चंद्रात्रेने २६ धावा केल्या. सौराष्ट्राचा संघ पहिल्या डावात केवळ १३२ धावा करु शकला. नील चंद्रात्रे आणि श्रेयस फडतरे यांनी प्रत्येकी ३ गडी बाद केले. तर विश्वजीत जगताप आणि अर्जुन सोनार यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले. फॉलोऑन नंतर सौराष्ट्रचा दुसरा डाव २०१ धावात आटोपला. श्रेयस फडतरेने ५, शौर्य देशमुख आणि अर्जुन सोनार यांनी प्रत्येकी २ तर नील चंद्रात्रेने १ गडी बाद केला.

महाराष्ट्राने हा सामना १ डाव आणि ८३ धावांनी जिंकला. त्यानंतर हिमाचल प्रदेश विरुद्ध महाराष्ट्राचा सामना झाला. या सामन्यात महाराष्ट्राने २३८ धावा केल्या. त्यातओम पाटील ११० आणि नील चंद्रात्रेने ३४ धावा केल्या.हिमाचल प्रदेशचा पहिला डाव १०२ धावात आटोपला. त्यात नील चंद्रात्रेने १ गडी बाद केला. हिमाचल प्रदेशचा दुसरा डाव ८१ धावात संपला. त्यात नीलने दोन गडी बाद केले.

मागील वर्षीही स्पर्धेत महाराष्ट्र संघातर्फे उपांत्यपूर्व फेरीत मध्य प्रदेश विरुद्ध दुसऱ्या डावात नीलने ५ गडी बाद केले होते. त्यावेळी त्याने विजय मर्चंट चषक स्पर्धेत तीन सामन्यात त्याने ३१ गडी बाद करुन महाराष्ट्रात सर्वोत्तम तर भारतात तिसरे स्थान मिळवले होते. गोवाविरुद्धच्या सामन्यात ७ आणि ८ असे एकूण १५ गडी, तर वडोदराविरुद्ध दोन्ही डावात प्रत्येकी ५ गडी बाद करण्याची कामगिरी नीलने केली होती.

## यशस्वी जैस्वाल कमबॅकसाठी सज्ज

**| मुंबई | प्रतिनिधी |**

टीम इंडियाचा युवा ओपनर यशस्वी जैस्वाल सध्या ऑफफिल्ड आहे. यशस्वीची आगामी टी २० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे.

टीम इंडिया त्याआधी मायदेशात न्यूझीलंड विरुद्ध मायदेशात वनडे आणि टी २० मालिका खेळणार आहे. बीसीसीआय या दोन्ही मालिकांसाठी येत्या काही दिवसात भारतीय संघाची घोषणा करणार आहे. बीसीसीआय निवड समिती यशस्वीला या दोन्ही मालिकांसाठी भारतीय संघात संधी देणार का? हे येत्या काही दिवसांतच स्पष्ट होईल.

यशस्वीच्या चाहत्यांना त्याच्या वाढदिवशीच (२८डिसेंबरला) गूड न्यूज मिळाली आहे. यशस्वी आता कमबॅक करण्यासाठी सज्ज झालाय. यशस्वीला आजारी असल्याने २ आठवडे क्रिकेटपासून दूर रहावं लागलं. मात्र आता टीम इंडियाच्या या युवा फलंदाजाने आजारावर मात केली आहे. भारताचा हा वाघ कमबॅकसाठी सज्ज झाला आहे. यशस्वी विजय हजारे ट्रॉफी २०२५-२०२६) स्पर्धेतून कमबॅक करणार आहे. यशस्वी गोवा विरूद्धच्या सामन्यातून एक्शन मोडमध्ये येणार आहे.

यशस्वीला १६ डिसेंबरला विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेतील सामन्यादरम्यान पोटात त्रास जाणवू लागला. त्यामुळे यशस्वीला रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. यशस्वीला डॉक्टरांनी काही दिवस विश्रांतीचा सल्ला दिला होता. त्यामुळे यशस्वीला सुरुवातीच्या काही सामन्यांना मुकावं लागलं.

स्पोर्टस्टारच्या रिपोर्ट्सनुसार, यशस्वी सोमवारी २९ डिसेंबरला संध्याकाळी मुंबई टीमसह जोडला जाणार आहे. मात्र यशस्वी या सामन्यात खेळणार की नाही? याबाबत अनिश्चितता आहे.

## डकार रॅली मोहिमेसाठी संजय टकले सज्ज

**| पुणे | वृत्तसंस्था |**

गेल्या वर्षी आपल्या पहिल्याच प्रयत्नात डकार रॅली पूर्ण करण्याचा ऐतिहासिक पराक्रम गाजविल्यानंतर संजय टकले आता आपल्या दुसऱ्या मोहिमेसाठी सज्ज झाले आहेत. जगातील सर्वांत कठीण मानली जाणारी ही रॅली तीन ते सतरा जानेवारी दरम्यान सौदी अरेबियामध्ये होणार आहे. यात संजय टकले आपली कामगिरी सुधारण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

माझा पहिला डकारचा अनुभव विलक्षण होता. एकदा तुम्ही ही शर्यत पूर्ण केली, की तुम्ही पूर्णपणे बदलून जाता. ही रॅली तुमची मानसिक कसोटी



पाहते. तुम्हाला थकवते आणि संयम, शिस्त व पुन्हा उभारी घेण्याचा खरा अर्थ शिकवते.

मी केवळ एक उत्तम ड्रायव्हर म्हणूनच नाही, तर एक वेगळा माणूस म्हणून बाहेर आलो आहे, असे डकार रॅली पूर्ण करणारे एकमेव भारतीय ठरलेले संजय टकले यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. यावेळी प्रकाश गौर, अनिरुद्ध देशपांडे, श्रीकांत आपटे हे उपस्थित होते.

## दुहेरीत वैष्णवी व अंकिताला जेतेपद

**पुणे** : सोलापूर येथे महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना व सोलापूर जिल्हा टेनिस संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महिलांच्या आयटीएफ टेनिस स्पर्धेत दुहेरीचे विजेतेपद भारताच्या वैष्णवी आडकर व अंकिता रैना या जोडीने संपादिले. तर एकेरीतून भारताच्या वैदेही चौधरीने अंतिम फेरी गाठली आहे. जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका, सोलापूर येथे सुरू असलेल्या या स्पर्धेत दुहेरीच्या अंतिम फेरीत दुसऱ्या मानांकित भारताच्या अंकिता रैनाने युवा खेळाडू वैष्णवी आडकरच्या साथीत भारताच्या झील देसाई व रशियाच्या एलिना नेपली या जोडीचा पराभव करून विजेतेपद संपादिले.

## डग ब्रेसवेलची निवृत्तीची घोषणा

**| नवी दिल्ली | वृत्तसंस्था |**

न्यूझीलंडचा अष्टपैलू क्रिकेटपटू डग ब्रेसवेलने ३५ व्या वर्षी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. १८ वर्षांच्या कारकिर्दीत त्याने २८ कसोटी, २१ वनडे आणि २० टी२० सामने खेळले. त्याच्या कुटुंबातील इतर सदस्यांनीही न्यूझीलंडसाठी क्रिकेट खेळले आहे.

यावर्षी आत्तापर्यंत अनेक क्रिकेटपटूंनी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. यात आता आणखी एक नाव सामील झाले आहे. १८ वर्षे क्रिकेट खेळल्यानंतर अष्टपैलू असलेल्या ब्रेसवेलने क्रिकेटला अलविदा म्हटले आहे.

क्रिकेटचा वारसा लाभलेल्या ब्रेसवेल कुटुंबातून



आलेल्या डगने न्यूझीलंडकडून आंतरराष्ट्रीय क्रिकेटही खेळले. त्याच्या बरगड्यांना झालेल्या दुखापतीमुळे या हंगामात त्याला फारसे क्रिकेट खेळता आले नाही. अखेर त्याने निवृत्तीचा निर्णय जाहीर केला आहे. ब्रेसवेलचे वडील आणि काका देखील न्यूझीलंडसाठी खेळले आहेत. तसेच त्याचा चुलत भाऊ मायकल ब्रेसवेल सध्या न्यूझीलंड संघाचा भाग असून जानेवारी २०२६ मध्ये भारताविरुद्ध वनडे मालिकेत न्यूझीलंड संघाचे नेतृत्वही करणार आहे.

---

**टी-२० इतिहासात कामगिरी करणारी पहिली गोलंदाज | ७ धावांत घेतल्या ८ विकेट्स**

# भूतानची गोलंदाज सोनमचा वर्ल्ड रेकॉर्ड

**| भूतान | वृत्तसंस्था |**

महिला क्रिकेटदेखील हळूहळू आपलं प्रस्थ वाढवत आहे. विश्वचषक, विविध लीग आणि द्विपक्षीय मालिकांमधील संघांची कामगिरी यामुळेही नवे खेळाडू तयार होत आहे. यादरम्यान भूतान आणि म्यानमार संघांमधील टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात २२ वर्षीय खेळाडूने विश्वविक्रम केला आहे.

भूतान आणि म्यानमार यांच्यात टी-२० आंतरराष्ट्रीय सामना खेळवला गेला. या सामन्यात भूतानने ८२ धावांनी दणदणीत विजय मिळवला. या सामन्यात भूतानने प्रथम फलंदाजी करताना १२७ धावा केल्या. यानंतर म्यानमारचा संपूर्ण



संघ ४५ धावांत सर्वबाद झाला. यामागे खरं श्रेय संघाची गोलंदाज सोनम येशे हिचं आहे. जिने एकटीने ८ विकेट्स घेत संघाचा धुव्वा उडवला.

२२ वर्षीय सोनम येशेने म्यानमारविरुद्धच्या टी २० सामन्यात चार षटकांत ७ धावा देत ८ विकेट्स घेतल्या. या भेदक गोलंदाजीदरम्यान तिने फक्त ७ धावा दिल्या. तिच्या गोलंदाजीविरूद्ध म्यानमारचे फलंदाज टिकू शकले नाहीत. तिने आंतरराष्ट्रीय टी-२० मध्ये सर्वाधिक विकेट्स घेण्याचा नवा विश्वविक्रम आपल्या नावे केला आहे.

सोनम येशेच्या आधी, पुरुषांच्या टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात फक्त दोन गोलंदाजांनी सात विकेट्स घेतल्या होत्या. मलेशियाच्या स्याजरुल इद्रुसने २०२३ मध्ये चीनविरुद्धच्या टी-२० सामन्यात सात विकेट्स घेतल्या होत्या. तर बहरीनच्या अली दाऊदने भूतानविरुद्धच्या टी-२० मध्ये सात विकेट्स घेतल्या. आता, सोनमने उल्लेखनीय कामगिरी करून या दोन्ही गोलंदाजांना मागे टाकलं आहे.

भूतानकडून या सामन्यात सोनमशिवाय नामगे चेजेने चांगली कामगिरी केली. तिने ४५ चेंडूत ५ चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ५० धावा केल्या. नंतर नामगे थिनलेने २२ चेंडूत २७ धावांचे योगदान दिलं. ताशी दोर्जीने १७ धावा केल्या आणि भूतानला २० षटकांत १२७ धावांपर्यंत पोहोचवण्यास मदत केली. म्यानमारचे सर्व फलंदाज फेल ठरले आणि परिणामी संघ ४५ धावांवर सर्वबाद झाला. म्यानमारकडून त्टेट लिन ओने १२ आणि प्या फ्यो वाईने १० धावा केल्या. या दोघांव्यतिरिक्त इतर फलंदाजांना दुहेरी आकडा गाठता आला नाही. सोनम येशेच्या गोलंदाजीसमोर म्यानमारच्या फलंदाजांनी गुडघे टेकले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)